CMYK

LIVE पार्श्वभूमी बीड पोर्टलसाठी
तालुका, शहर व गावनिहाय
प्रतिनिधी नेमणे आहे
संपर्क : दै.पार्श्वभूमी कार्यालय, भाजी मंडई, बीड.
संपादक गंमत भंडारी 9422295333 8623880100

# पार्श्वभूमी

रियांश एन्टरप्राईजेस
नामांकित कंपनीचे LED टी.व्ही.
50% पर्यंतच्या सवलती दरात मिळतील
पत्ता : शॉप नं.92 व 93 सारडा सेंट्रल, डी.पी.रोड, बीड.
Mob.9511511818

बीड वर्ष ३६ वे अंक ७३ वा फोन २३०१०१ दिनांक १० फेब्रुवारी २०२६ मंगळवार गंमत भंडारी ई-पेपर : www.parshvbhumi.com Reg.No.L/85/RNP/Beed/2020-22 RNI Regd.no. MAHMAR/1990/501 पाने ६ किंमत ४रु.

# राज्यात ७० हजार सरकारी पदं भरण्याची घोषणा
# मात्र लबाडाचं आवतन जेवल्याशिवाय खरं नाही



बीड दि.९ (प्रतिनिधी):– दीर्घ कालावधीनंतर राज्य सरकारने शासनाच्या विविध कार्यालयातील पदांची भरती करण्याचा निर्णय घेतला आहे. येत्या काळात राज्य सरकार ७० हजार सरकारी पदे भरणार असल्याची घोषणा राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलेली असली तरी या अगोदर अनेक सरकारांमध्ये अशा घोषणा झाल्या. काही वेळेस परीक्षाही झाल्या. उत्तीर्ण विद्यार्थ्यांच्या याद्या लावल्या गेल्या, मात्र त्यांना पदस्थापना मिळाली नाही. अशी अनेक प्रकरणे असतांना नव्याने भरतीची घोषणा स्वागतार्ह आहे. मात्र खरोखरच ही पदे भरली जाणार आहेत की नाहीत? का लबाडाचं आवतन जेवल्याशिवाय खरं नाही असेच म्हणण्याची वेळ बेरोजगारांवर येऊ नये अशा प्रतिक्रिया व्यक्त होत आहेत.

राज्यात लवकरच सुमारे ७० हजार पदांची मोठी नोकरभरती प्रक्रिया राबवण्यात येणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. ही भरती नव्या, पारदर्शक आणि डिजिटल पद्धतीने करण्यात येणार असून तरुणांसाठी ही मोठी संधी मानली जात आहे. या भरतीमध्ये महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत (MPSC) घेण्यात येणाऱ्या सुमारे २० हजार पदांचा पान २ वर

## राज्य प्रशासनात कार्यक्षमतेला गती

राज्य शासनाच्या विविध विभागांमध्ये ७० हजार पदे भरल्यानंतर प्रशासनाच्या कार्यक्षमतेत मोठी वाढ होईल. भरती प्रक्रियेत कोणताही पक्षपात किंवा अन्याय होऊ नये, यासाठी संपूर्ण प्रणाली पारदर्शक आणि विश्वासार्ह असावी, असेही मुख्यमंत्री म्हणाले. तरुणांच्या मनातील शंका दूर करण्यासाठी स्वच्छ, वेगवान आणि तंत्रज्ञानाधारित भरती प्रणाली उभारण्यावर शासनाचा भर असेल.

## पारदर्शक आणि डिजिटल भरती प्रक्रिया

भरती प्रक्रियेत अनावश्यक कागदपत्रे, लांब रांगा आणि विलंब टाळण्यासाठी ऑनलाइन व डिजिटल व्हेरिफिकेशन मॉडेल विकसित करण्यावर भर देण्यात येणार आहे. ब्लॉकचेन तंत्रज्ञान (Blockchain Verification) आणि डिजिलॉकर प्रणालीचा (DigiLocker System) वापर करून प्रमाणपत्र पडताळणी सुलभ करण्यात येईल. पासपोर्टसारख्या संवेदनशील दस्तऐवजांची ऑनलाइन पडताळणी शक्य असल्यास, इतर प्रक्रियांमध्येही हे मॉडेल वापरण्याच्या सूचना देण्यात आल्या.

# माजलगावच्या बसस्थानकावर गंठन चोरीची मालिका सुरूच
## बस स्थानकात झालेल्या चोरीचा तपासच लागेना ; प्रवाशांमध्ये दहशतीचे वातावरण

माजलगाव दि.९ ( प्रतिनिधी ):- येथील बसस्थानक हे प्रवाशांच्या दृष्टीने अतिशय असुरक्षित बनले असुन गंठन चोरीची मालिका सुरूच असल्याने प्रवाशांमध्ये दहशतीचे वातावरण निर्माण झाले असुन पुन्हा सोमवारी शकुंतला शरद पत्की या महिलेच्या गळ्यातुन एक तोळ्याचे गंठन चोरीला गेल्याची घटना घडली असुन या प्रकरणी शहर पोलिसात अज्ञात चोरट्यांविरूध्द तक्रार देण्यात आली आहे.
मराठवाड्यातील सर्वात चांगले बसस्थानक म्हणुन माजलगाव बसस्थानकाची ओळख परंतु इमारत बांधकामासाठी पाडल्यामुळे शेडमधुन सुरू असलेल्या कामाकाजाचा प्रवाशांवर मोठा परिणाम होतांना दिसुन येत आहे. याठिकाणी कसलीही बसण्याची सुविधा नाही तर उन्हाळ्याचे दिवस सुरू असुन ना पंखे, ना पिण्याचे पाणी यासह प्रवाशांकरीता गरजेच्या असलेल्या सुविधांचा मोठा अभाव याठिकाणी पहायला मिळतो. असे असतांना मात्र लोकप्रतिनिधी पान २ वर

# भूमी अभिलेख अधिकाऱ्यांकडून शनी मंदिर परिसराची स्थळ पाहणी
## रामनाथ खोड मंदिराला कुलूप लावून पसार

बीड दि.९ (प्रतिनिधी):- पेठ बीड भागातील शनी मंदिर परिसरात भूमी अभिलेख जिल्हा अधीक्षक शिंदे व त्यांच्या सहकाऱ्यांनी सोमवारी स्थळ पाहणी केली. अधिकारी स्थळ पाहणीला येताच तक्रारदार रामनाथ खोड मंदिराला कुलूप लावून पसार झाले. या संदर्भात भूमी अभिलेख विभागाने त्यांना या आधी स्थळ पाहणीची नोटीसही दिली होती. त्यामुळे ते हजर राहिले किंवा नाही राहिले तरीही काही फरक पडत नाही. विशेष म्हणजे अधिकारी मंदिराच्या नव्हे तर परिसराच्या स्थळ पाहणीला आले होते. त्यांनी स्थळ पाहणी करुन आवश्यक त्या नोंदीही घेतल्या.
बीड शहरातील पेठ बीड भागातील शनी मंदिर देवस्थान प्रकरणात भूमी अभिलेख विभागाचे जिल्हा अधीक्षक शिंदे यांच्यासह अन्य अधिकारी, कर्मचारी सोमवारी दुपारी मंदिर परिसराच्या स्थळ पाहणीसाठी आले होते. तक्रारदार खोड हे अधिकारी येईपर्यंत तिथे होते. अधिकारी आल्यानंतर मात्र मंदिराला कुलूप दिसले. कुलूप लावून जाताना सीसी टीव्हीमध्ये दिसत आहेत. वास्तविक पाहता अधिकारी मंदिराची नव्हे तर परिसराच्या स्थळ पाहणीसाठी आलेले होते. त्यामुळे अधीक्षक शिंदे यांनी प्रत्यक्षात ज्यांचा ताबा आहे त्यांची मोजणी करुन त्याच्या नोंदी देखील घेतल्या आहेत. त्या ठिकाणी प्रत्यक्ष ताबा आणि बांधकामाच्या नोंदी देखील अधिकाऱ्यांनी घेतल्या. स्थळ पाहणीच्या अनुषंगाने अधिकाऱ्यांनी परिसरात पाहणी केली, त्या ठिकाणी कोण कोण राहात आहे याच्या देखील पान २ वर

# न्यायालयाचा मनाई हुकूम असतांनाही जमिनीची विक्री करणाऱ्या शेख फय्याजला ३ महिन्यांची शिक्षा

**मनाई असतांनाही खरेदी, विक्री करणाऱ्यांना दणका**

बीड दि.९ (प्रतिनिधी):- न्यायालयाच्या स्पष्ट मनाई हुकूमाचा भंग करुन जमीन विक्री केल्या प्रकरणी हिंगोली येथील वरिष्ठ स्तर दि.न्यायाधीश व्ही.एस.मानखैर यांनी शेख फय्याज हाजी शेख इस्माईल यास ३ महिने दिवाणी कारावासाची शिक्षा सुनावली आहे. विशेष म्हणजे या प्रकरणात आरोपीने माफी मागितली होती परंतु न्यायालयाने माफी फेटाळत ही शिक्षा सुनावली आहे.
हिंगोली येथील वंजारवाडा परिसरातून गट क्रमांक १२४ मधील संबंधीत जमिनीबाबत दावा प्रलंबित असतांना १३ डिसेंबर २०१२ रोजी न्यायालयाने विक्रीस स्पष्ट मनाई करणारा अंतरीम आदेश दिला होता. सदरील आदेश असतांनाही शेख फय्याज यांनी २ मे २०१७रोजी संबंधीत जमीन खरेदीखताद्वारे इतरांना विकली. या आदेश भंगा विरोधात माधव तुकाराम बांगर यांनी दिवाणी अर्ज दाखल केला होता. सुनावणी दरम्यान न्यायालयाने आदेशाचा जाणीवपुर्वक भंग झाल्याचे स्पष्ट मान्य केले. न्यायालयीन मनाई असतांनाही होणाऱ्या खरेदी, विक्री व्यवहारामुळे सामान्य नागरिकांची फसवणूक होत पान २ वर

# महिला व बालविकास अधिकारी ते मंत्रालय सचिवाच्या टक्केवारीतून बीड जिल्ह्यात बालगृह मूल्यनिर्धारण घोटाळा - डॉ. जितेंद्र ओव्हाळ

बीड दि.९ (प्रतिनिधी):- बाल न्याय अधिनियम २०१५ फक्त कागदावरच का असा प्रश्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर विकास मंच अध्यक्ष डॉ.जितेंद्र ओव्हाळ यांनी महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे यांना केला. महिला व बालकविकास बीडच्या अधिकाऱ्यांनी डोळे झाकून मूल्यनिर्धारण प्रस्ताव मंजुरीसाठी पाठवले का जाग्यावर पुरेशी इमारत नाही ना बायोमॅट्रिक हजेरीची पडताळनी नाही मग वरिष्ठ गप्प का चौकशीचे निवेदन आयुक्त यांना दिले महिला व बालविकास पान २ वर

# बीडमध्ये उद्यापासून पोलीस भरती
## भरती पारदर्शक होणार, प्रलोभनाला बळी पडू नका –नवनीत काँवत



बीड दि.९ (प्रतिनिधी):- बीड पोलीस दलात सन २०२४-२५ ची पोलीस भरती प्रक्रिया ११ फेब्रुवारीपासून सुरु होत आहे. ११ फेब्रुवारी ते १८ फेब्रुवारी दरम्यान ८ हजार १७४ भरतीस इच्छुक उमेदवार या ठिकाणी येणार आहेत. १७४ पदांसाठी ही भरती प्रक्रिया होत आहे. रविवार दि.१५ फेब्रुवारी वगळता दररोज किमान एक हजार ते बाराशे उमेदवार भरतीसाठी येणार आहेत. ही भरती पूर्णपणे पारदर्शक असणार आहे. प्रत्येक ठिकाणी सीसी टीव्ही कॅमेरे असणार आहेत. त्याच बरोबर तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येत आहे. उंची मोजण्यासाठीही डिजिटल स्क्रीनचा वापर करण्यात येणार आहे. १०० मीटर रनींगसाठी फूट ऑफ फिनीश, जो की ऑलिम्पींकमध्ये याचा वापर केला जात आहे, ती पद्धत या


### बाहेरुन येणाऱ्या उमेदवारांसाठी पोलिसांकडून राहण्याची व्यवस्था

बीड पोलीस दलात ११ फेब्रुवारीपासून पोलीस भरती प्रक्रियेला सुरुवात होत आहे. भरती प्रक्रिया पहाटे ५ वाजता सुरु होणार आहे. त्यामुळे जे उमेदवार लांबून येणार आहेत त्यांच्यासाठी राहण्याची आणि आराम करण्याची व्यवस्था बीड पोलीस दलाच्या वतीने करण्यात आलेली आहे. त्यासाठी इच्छुकांनी बीड पोलिसांशी संपर्क करावा असे आवाहन पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी केले आहे. जे उमेदवार लांबून येथे येत आहेत. भरती प्रक्रिया सकाळी ५ वाजता पान २ वर



ठिकाणी राबविण्यात येत आहे. १६०० मीटर रनिंगसाठीही याच पद्धतीचा वापर करण्यात आलेला आहे. प्रत्येक बाबीमध्ये जेवढे शक्य असेल तेवढा तंत्रज्ञानाचा वापर करुन कमीत कमी मानवी हस्तक्षेप असणार आहे. जे लोक भरतीसाठी येणार आहेत. त्यांना आवाहन करण्यात येत आहे की, कुठल्याही प्रकारचे उत्तेजक द्रव्य घेऊ नयेत किंवा कोणी पोलीस दलात नोकरीस पान २ वर

# शरद पवारांची प्रकृती बिघडली



पुणे दि.९ (वृत्तसेवा):- राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वेसर्वा शरद पवार यांच्या प्रकृतीत बिघाड झाल्याने त्यांना बारामतीहून पुण्यातील रुबी हॉल क्लिनिकमध्ये दाखल करण्यात येत असल्याची माहिती समोर येत आहे. खोकल्याचा तीव्र त्रास जाणवू लागल्याने डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार त्यांना तातडीने पुण्यात हलवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.
मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, गेल्या काही दिवसांपासून शरद पवार यांना अस्वस्थ वाटत होते. खोकल्याचा त्रास सुरू होता. आज बारामतीमध्ये असतानाच त्यांची तब्येत अधिक बिघडल्याचे जाणवताच वैद्यकीय सल्ला घेण्यात आला. त्यानंतर कोणताही धोका न पत्करता त्यांना पुण्यातील रुबी हॉल क्लिनिकमध्ये पुढील पान २ वर

# माजलगावच्या लेकी जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत परभणी जिल्हयात विजयी
## सौ.दिपालीताई चौधरी सौ.सुचितताताई भरोसे विजयी

माजलगाव दि.९ (प्रतिनिधी) माजलगाव चे माजी आमदार राधाकृष्ण आण्णा होके पाटील यांची पुतणी सौ. दिपालीताई अजय राव चौधरी आणि माजलगाव बाजार समितीचे माजी उपसभापती



सुखदेवराव लंगडे यांची कन्या सौ.सुचितताताई आनंदराव भरोसे या दोन माजलगावच्या लेकी परभणी जिल्हा परिषद निवडणुकीत प्रचंड मताधिके घेऊन विजयी झाले आहेत त्यामुळे माहेरामध्ये आनंद उत्सव साजरा होत आहे. पान २ वर

### तब्बल १ वर्षानंतर तक्रारदारालाच पुरावे घेऊन यायला सांगितले
# बीडीओ सानप भ्रष्टाचाराच्या तक्रारीवर चौकशी करण्याऐवजी सुनावणी घेऊ लागले

बीड दि.९ (प्रतिनिधी):- बीड तालुक्यातील मौजे परभणी के. येथे विविध विकास कामात झालेल्या भ्रष्टाचाराची सक्षम अधिकाऱ्यामार्फत चौकशी झाल्याशिवाय देयक अदा करण्यात येऊ नये अशी तक्रार ग्रामपंचायत सदस्य दत्तात्रय कवचट यांनी ८ जानेवारी २०२५ रोजी केली होती. या तक्रारीनंतर तब्बल १ वर्षांनी बीडचे गटविकास अधिकारी ए.डी.सानप यांना जाग आली आहे. त्यातही सदरील तक्रारीच्या अनुषंगाने चौकशीचे आदेश देण्याऐवजी त्यांनी चक्क सुनावणी ठेवली आहे. एवढेच नव्हे तर तक्रारदारालाच सर्व पुराव्यासह हजर रहायला सांगितले होते. ज्यावेळी तक्रार केली त्याच वेळी पुरावे दिले होते, मग आता चौकशी ऐवजी सुनावणी घेऊन बीडीओ सानप यांना नेमके काय सिद्ध करायचे आहे असा प्रश्न उपस्थित होऊ लागला आहे.
बीड तालुक्यातील परभणी के. येथे विविध कामात मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झाल्याची तक्रार दत्तात्रय चंद्रसेन कवचट यांनी ८ जानेवारी २०२५ रोजी पंचायत समिती गटविकास पान २ वर

**पाहिजेत**
2 रिसेप्शनिष्ट
3 साफसफाई कर्मचारी
(रुम सर्व्हीस)
गरजुंनी संपर्क करावा.
: भेटण्याची वेळ :
दु.12.00 ते 4.00
हॉटेल साई पॅलेस
जालना रोड, बीड.
16534-13445

**गाळा विकणे आहे**
वैद्यनाथ बँकेसमोर, ब्युटी कलेक्शनच्या वर, डी.पी.रोड येथील 10 x 32 चा गाळा विकणे आहे.
:: संपर्क ::
9021555544
9890000660
P.P.

# निर्धार केला की दुसऱ्या विचारांना थारा देऊ नका -अंजली धानोरकर
## ह.भ.प.महादेव महाराज चाकरवाडीकर यांना सद्भावना पुरस्कार प्रदान



बीड दि.९ (प्रतिनिधी):- एकदा निर्धार केलात की दुसऱ्या विचाराला थारा देऊ नका तरच तुम्हाला तुमचे उद्दिष्ट गाठता येईल असे आवाहन छत्रपती संभाजीनगरच्या उपजिल्हाधिकारी अंजली धानोरकर यांनी केले. त्या येथील सद्भावना प्रतिष्ठानच्या वतीने दिल्या जाणाऱ्या स्व.राध्येशाम मुंदडा स्मृती सद्भावना पुरस्कार समारंभात बोलत होत्या.यावेळी व्यासपीठावर .यावर्षी हा पुरस्कार ह.भ.प.महादेव महाराज चाकरवाडीकर यांना ह.भ.प.लक्ष्मणमहाराज मेंगडे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी व्यासपीठावर पान २ वर

# झुंजार धांडेंनी पाठपुरावा केल्यामुळेच धांडे नगरच्या नाला कामाला सुरुवात



बीड दि.९ (प्रतिनिधी):- शहरातील बार्शी रोडवरील धांडे नगर भागातील मोठ्या नाल्याचा प्रश्न गेल्या ५ वर्षापासून रखडला होता. या संदर्भात झुंजार धांडे यांनी वेळोवेळी पाठपुरावा केला, जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रारी केल्या, मंत्र्यांना निवेदने दिली. या नाल्याचे काम पूर्ण करा अशी आग्रही मागणी केली परंतु बैठका व्हायच्या, अधिकारी मोजणी करुन जायचे परंतु प्रत्यक्ष कामाला काही सुरुवात होत नव्हती. शेवटी सप्टेंबरमध्ये झालेल्या अतिवृष्टीमध्ये अर्धवट नाला कामामुळे धांडे नगर भागाला मोठा फटका बसला. संपूर्ण परिसर जलमय झाला होता. त्यानंतरही झुंजार धांडेंनी सातत्याने पाठपुरावा करुन या नाल्याचे काम झाल्यास या भागातील लोकांचे होणारे हाल थांबतील हे दाखवून दिले. अखेर धांडेंच्या पाठपुराव्याला यश आले आणि सोमवारी नाला कामाला प्रत्यक्ष सुरुवातही झाली. बीड शहरात सप्टेंबर २०२५ मध्ये झालेल्या पावसात ज्या धांडे नगरला पावसाचा वेढा पडलेला होता. चारही बाजूने सर्वत्र पान २ वर

CMYK

पान १ वरून

## राज्यात ७० हजार सरकारी पदं भरण्याची घोषणा

समावेश असेल, तर उर्वरित पदे आयोगाबाहेरील विविध विभागांमध्ये भरली जाणार आहेत. सह्याद्री अतिथीगृह येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली सेवा प्रवेश नियमावली सुधारणा संदर्भात उच्चस्तरीय बैठक पार पडली. बैठकीस मुख्य सचिव राजेश अग्रवाल तसेच सर्व अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव आणि संबंधित विभागांचे सचिव उपस्थित होते. भरती प्रक्रियेत आवश्यक कौशल्ये (Skills Based Recruitment), पात्रता निकष आणि कामाच्या स्वरूपानुसार निर्णय घेतले जातील, असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले. सेवा प्रवेश नियमावलीतील बदलांचा प्रस्ताव लवकरच मंत्रिमंडळ बैठकीत मांडला जाणार आहे.

महाराष्ट्राचे मॉडेल देशासाठी मार्गदर्शक

मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत झालेल्या मुख्यमंत्र्यांच्या परिषदेत महाराष्ट्र शासनाचे मनुष्यबळ व्यवस्थापन मॉडेल सर्वाधिक प्रशंसनीय ठरले. इतर राज्यांनीही हे मॉडेल स्वीकारावे, असे निर्देश पंतप्रधानांनी दिल्याचे त्यांनी नमूद केले. येणाऱ्या एका वर्षात महाराष्ट्रात गव्हर्नन्स रिफॉर्म्सचे नवे मॉडेल उभे राहील, असा विश्वास मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला.

## शनी मंदिर परिसराची स्थळ पाहणी

नोंदी घेण्यात आल्या आहेत. दरम्यान मंदिराला कुलूप लावून जाता येत नाही तरीही जाणिवपुर्वक कुलूप लावून जाणे हा गुन्हाच आहे अशी चर्चा त्या ठिकाणी होत होती.

## माजलगावच्या बसस्थानकावर गंठण चोरीची मालिका

तसेच प्रशासकीय अधिका-यांची याकडे उदासिनता दिसुन येते. मागील दोन महिन्यांच्या काळात जवळपास ८ ते १० महिलांच्या गळ्यातील दागिन्यांच्या चो-याची नोंद असतांना देखिल अद्यापही एकही बसस्थानकातील दागिने चोर सापडला नाही. या शेडमध्ये प्रवाशांच्या सुरक्षेच्या दृष्टीने सिसीटीव्ही यंत्रणा देखिल नाही. त्यामुळे चोरटे सक्रिय झाले असुन प्रवाशी महिलांच्या गळ्यातील दागिण्यांची चोरी वाढली आहे.

## बीड जिल्ह्यात बालगृह मूल्यनिर्धारण घोटाळा

अधिकारी ससे यांना निवेदन दिले २०२४-२५ मधील तब्बल ६० बालगृहाचे वार्षिक मूल्यनिर्धारण मंजुरीसाठी पाठवून शासनाची दिशाभूल बीड च्या महिला व बालविकास अधिकारी यांनी केली डॉ जितेंद्र ओव्हाळ यांनी प्रस्तावाची पुन्हा तपासणी मागणी केली हा घोटाळा २००९ पासून चालू असल्याचा आरोप ओव्हाळ यांनी केला २००९. पासून आयुक्त तसेच जिल्हाधिकारी गप्प का असाही प्रश्न त्यांनी उपस्थित केला बालगृहाचा घोटाळा समोर येऊ नये यासाठी मंत्रालयापर्यंत टक्केवारी झाली असा आरोप डॉ. जितेंद्र ओव्हाळ यांनी रविवारी केला दरम्यान इमारत व विद्यार्थी बियोमेट्रिक हजेरीची स्पॉट पडताळणी करा असे निवेदन महिला व बालविकास च्या मंत्री अदिती तटकरे जिल्हाधिकारी ससे साहेब यांना देत तीव्र आंदोलन करण्याचा इशारा डॉ. बाबासाहेब आंबेडकर विकास मंच अध्यक्ष डॉ. जितेंद्र ओव्हाळ यांनी दिला आहे यासाठी मंगळवारी महिला व बालविकास आयुक्त यांची भेट घेणार असल्याची माहिती डॉ. जितेंद्र ओव्हाळ यांनी दिली आहे.

## बीडीओ सानप भ्रष्टाचाराच्या तक्रारींवरुन चौकशी करण्याऐवजी ...

अधिकारी बीड यांच्याकडे केली होती. त्यानंतर १९ जानेवारी २०२६ रोजी पुन्हा दुसऱ्यांदा तक्रार केली. तक्रारीत म्हटले आहे की, साने गुरुजी माध्यमिक विद्यालयाच्या दक्षिण व उत्तर बाजुस शाळेने मनरेगा अंतर्गत सिमेंट रस्त्याचे ज्याचा वर्ककोड आरसी १२३४९२७४१५ आहे. या कामामध्ये ८० एमएम खडीचा लेअर नाही, त्यावर पीसीसी केलेला नाही. वाळू, खडी व मुरुमाच्या पावत्या बोगस असून शासनाचा महसूल बुडाला आहे. मोजमाप पुस्तिके प्रमाणे त्याची प्रत्यक्ष लांबी कमी आहे, संचिकेमध्ये कारनाम्यावर सरपंच, ग्रामसेवक, गुत्तेदार यांच्या सह्या नाहीत, त्याहूनही गंभीर बाब म्हणजे कारनाम्यासाठी शंभर रुपयांचा मुद्रांक वापरणे बंधनकारक असताना सरपंच, ग्रामसेवकाने ते सुद्धा केले नाही. संचिकेत विशाल ट्रेडर्स या दुकानाच्या बोगस पावत्या जोडलेल्या आहेत. त्या दुकानाचा जीएसटी नंबर चेक केला असता दुकानदाराला वाळू, खडी, मुरुम विक्री करण्याचा कोणताही अधिकार नाही, ही शासनाची मोठी फसवणूक असून या प्रकरणात फसवणुकीच्या कलमा अंतर्गत गुन्हे दाखल करावेत. गावातील अनेक सिमेंट रस्त्यांची कामे याच पद्धतीने केलेली आहेत. १५ व्या वित्त आयोगातून शाळेस साहित्य खरेदीसाठी मोठ्या प्रमाणात रक्कम उचललेल्याची नोंद असून त्यातील साहित्य आजपर्यंत शाळेला दिलेले नाही. यासह भ्रष्टाचाराची अनेक प्रकरणे असून या सर्व प्रकरणात चौकशी करुन कारवाई करावी अशी मागणी कचवट यांनी केली होती. त्यावर बीडीओंनी चौकशी करण्याऐवजी तक्रारदाराला पुराव्यासह हजर रहायला सांगितले होते.

## न्यायालयाचा मनाई हुकूम असतांनाही....

असल्याच्या पार्श्वभूमीवर न्यायालयाने शेख फय्याज हाजी शेख इस्माईल, रा.पेन्शनपुरा, हिंगोली यास ३ महिन्यांची दिवाणी कारावासाची शिक्षा सुनावली आहे. न्यायालयाच्या हा निकाल महत्वाचा मानला जात असून कायदे तज्ञांनी हि बेकायदेशीर व्यवहारांना आळा घालण्यासाठी हा निर्णय दिशादर्शक ठरेल असे मत व्यक्त केले आहे.

## बीडमध्ये उद्यापासून पोलीस भरती...

लावतो असे म्हणून प्रलोभन देत असेल त्याला बळी पडू नका, असा कुठलाही प्रकार भरती प्रक्रियेमध्ये नाही. असा प्रकार झाल्यास तक्रार करा, संबंधीताविरुद्ध गुन्हा दाखल करु असे पोलीस अधीक्षक नवनीत कॉंवत यांनी सांगितले आहे. गेल्या वर्षीही भरती प्रक्रिया दरम्यान उत्तेजक द्रवांचा वापर झाला होता. त्यामध्ये गुन्हा दाखल झाला होता अशी माहिती त्यांनी दिली. असा काही संशय आढळल्यास संबंधीत व्यक्तिच्या रक्ताचे नमुने घेऊन तपासले जाणार आहेत. बीड पोलिसांनी जे काही नियम भरती प्रक्रियेच्या अनुषंगाने ठरवून दिलेले आहेत त्याची सर्व माहिती बीड पोलीस वेब साईटवर मिळेल. भरतीसाठी येणाऱ्या सर्व इच्छुक उमेदवारांना शुभेच्छा देतो असे म्हणत नियमांचे पालन करावे असे आवाहन पोलीस अधीक्षक नवनीत कॉंवत यांनी केले आहे.

### बाहेरुन येणाऱ्या उमेदवारांसाठी व्यवस्था

**सुरु होणार आहे. त्यांची तात्पुरती राहण्याची व्यवस्था बीड पोलीस दलाने केलेली आहे. यासाठी इच्छुकांनी बीड पोलिसांशी संपर्क करावा जेणेकरुन त्यांची गैरसोय होणार नाही असेही पोलीस अधीक्षक नवनीत कॉंवत यांनी सांगितले.**


## जाहीर प्रगटन

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे सुचित करण्यात येते की, माझे पक्षकाराने १) श्री.राधेशाम लक्ष्मीनारायण दायमा व २) श्री.शामसुंदर लक्ष्मीनारायण दायमा यांचे मालकीची व ताब्यात असलेली बीड मोहल्ला मसरत नगर येथील नगर परिषद हद्दीच्या आतील घरजागा ज्यास शहर भुमापन क्रमांक २३८७पैकी असा मिळालेला आहे व बीड नगर परिषद मालमत्ता क्रमांक २-१०-५७७ असा मिळालेला आहे. ज्याची लांबी : दक्षिण-उत्तर ५० फुट व रुंदी : पुर्व-पश्चिम २० फुट एकूण क्षेत्रफळ १००० चौरस फुट असून ज्यामध्ये ३६.२७ चौरस मीटर क्षेत्रफळाचे तळमजला बांधकाम व २२.३२ चौरस मीटर क्षेत्रफळाचे पहिला मजला आर.सी.सी. बांधकाम आहे. सदर घरजागेची चतु:सिमा पुर्वेस - श्री.अभिजीत लोळगे यांचे राहते घर, पश्चिमेस - श्री.गायकवाड यांचे घर, दक्षिणेस - श्री.वर्मा यांचे घर व उत्तरेस - सरकारी रस्ता येणे प्रमाणे वर्णन असलेली घरजागा माझे पक्षकाराने कायम खरेदी घेण्याचा ठराव केला असून विक्रेत्यांनी सदर घरजागा निर्वीवाद असल्याची खात्री दिली आहे. या उपर सदर घरजागेमध्ये जर कोणाचे काही हितसंबंध जसे की खरेदीखत, इसार पावती, गहाणखत, मृत्युपत्र, आममुख्त्यारपत्र इ.स्वरुपाचे असतील तर संबंधीतांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झालेपासून ८ दिवसाचे आत योग्य त्या पुराव्यासह खालील पत्त्यावर आपला आक्षेप नोंदवावा. मुदतीत जर कोणाचा काही आक्षेप आला नाही तर माझे पक्षकार सदरील घरजागा निर्विवाद आहे असे समजुन सदर घरजागेचे कायदेशीर खरेदीखत करुन घेतील, त्यानंतर कोणाचा कसलाही आक्षेप चालणार नाही.

सबब हे जाहीर प्रगटन.

- जाहीर प्रगटन देणार -

ॲड.विजयकुमार मोतीलाल कासट

कासट कॉम्प्लेक्स, सुभाष रोड, बीड.

मो.नं.९४२२७४१०९१

12979


## ह.भ.प.महादेव महाराज चाकरवाडीकर यांना सद्भावना पुरस्कार

प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्राचार्य रत्नाकर क्षीरसागर आणि सचिव कल्याण कुलकर्णी हे उपस्थित होते.

या पुरस्कार समारंभात प्रमुख वक्त्या म्हणून अंजली धानोरकर यांनी स्फूर्तीदायी भाषण केलं. काही महापुरुषांच्या जीवनप्रसंगातील दाखले देत त्यांनी आपले मुद्दे स्पष्ट केले.निर्धाराने टोकाच्या गोष्टीही साध्य करता येतात असं त्या म्हणाल्या त्यासाठी सारे नकारात्मक विचार दूर सारले जावेत.हे ठामपणे करता येते ,एकदा प्रयत्न तर करा असे त्या म्हणाल्या.एकदा काऊंट डाऊन करीत क्षण साधला की निर्धार तडीला जातोच असा आपलाही अनुभव असल्याचं त्या म्हणाल्या.

याप्रसंगी स्वर्गीय राधेश्यामजी मुंदडा यांची नात कुमारी गौरी कमलेश मुंदडा हिनेही आपले आजोबा विषयीच्या आठवणी विशद केल्या व आपले मनोगत व्यक्त केले.. यावेळी पुरस्कारप्राप्त ह.भ.प.महादेवमहाराजांनी ही आपलं मनोगत व्यक्त केलं.ते म्हणाले, वडिलांचे कार्य पुढे नेणे शक्य झाले ते समस्त भाविकभक्तांच्या सहकार्याने,मी फक्त निमित्तमात्र आहे.जगाच्या कल्याणासाठी संतांनी दाखवलेल्या मार्गावर चालून आचरण केल्यास मानवी जीवनाचे कल्याण होते हे मी वै. माऊलीमहाराज आणि समस्त संत चरित्र आणि विचारातून शिकलो.आगामी काळातही आपल्याकडून संतांची आणि समाजाची सेवा घडावी हाच प्रयत्न राहील असे ते म्हणाले. यावेळी ह.भ.प.लक्ष्मण महाराज मेंगडे यांनीही आशीर्वचनपर मार्गदर्शन केले. प्रारंभी महादेवमहाराजांचा सपत्नीक सत्कार करून त्यांना दाक्षिणात्य पद्धतीने सद्भावना पुरस्कार प्रदान करण्यात आला. या वेळी नितीन चंद्रकोटेचा यांना चंपावती भूषण पुरस्कार मिळाल्याबद्दल व्यासपीठावरील मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.तसेच

नवनिर्वाचित उपनगराध्यक्ष विनोद मुळूक. नगरसेवक अमर नाईकवाडे

नगरसेवक फारूक पटेल नगरसेवक शुभम धूत व नगरसेवक दिनेश मुंदडा यांचाही मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.या कार्यक्रमाला प्रमुख

उपस्थित जेस्ठ वकील कालिदासराव थि गळे.. माहेश्वरी प्रदेश सभाचे श्रीमान सत्यनारायणाची लाहोटी राजस्थानी सेवा समाज चे सचिव रामेश्वर जी कासट. दैनिक लोकप्रश्न चे दिलीप खिस्ती. नानासाहेब काकडे. अरुण नाना डाके. व्यापारी महासंघाचे हेरकर सर. भास्करराव जाधव. माहेश्वरी प्रगती मंडळाचे अध्यक्ष सुरेंद्र कासट

विष्णुदास बियाणी.. विष्णुदास तापडिया. बीड जिल्हा व्यापारी महासंघाचे उपाध्यक्ष जवाहर शेठ कांकरिया .. जैन श्रावक संघाचे शोभाचंदजी मूगदिया..सुशील खटोड दिलीप खिंवसरा.. दीपक सुराणा

द्वारकादास मंत्री राजस्थानी विद्यालय व संस्कार विद्यालयाचे शिक्षक वृंद.

पत्रकार महेश वाघमारे.

संस्कार प्रबोधिनीचे राजेंद्र प्रसाद..

दैनिक चंपावती चे सुनील शिरसागर दत्त मंदिर ट्रस्टचे नवनाथ राव कुलकर्णी. मथुरा दास जी कासट राधेश्याम कासट किशोर बाहेती प्रकाश कानगावकर तसेच

राजस्थानी विद्यालयाचे माजी मुख्याध्यापक रामलाल छाजेड सर द्वारकादास मंत्री राजस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक लाहोटी सर.... मालपाणी सर सारंग वाघमारे सर. रोटरी क्लबचे माजी अध्यक्ष मुकुंद कदम. संकेत कदम सचिव सुमित जयस्वाल. संदीप खोड. गणेश मुळे रोटरी क्लब बीड मिड टाउन चे अध्यक्ष राहुल बोरा. काझी सेवा संघाचे महाराष्ट्र काझी सेवा संघाचे महाराष्ट्र अध्यक्ष मोहम्मद शफी काझी इत्यादी अनेक मान्यवर उपस्थित होते

कार्यक्रमाचे. प्रास्ताविक प्रा .रत्नाकर क्षीरसागर यांनी केले तर परिचय कल्याण कुलकर्णी यांनी करून दिला.कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन राजेंद्र मुनोत आणि सौ.,उर्मिला कुलकर्णी यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी वाय. जनार्दन राव,अभय कोटेचा,शांतीभाई पटेल, राम मोटवाणी,गोपाल कासट, सूरज लाहोटी,पुसाराम लद्दड, विश्वनाथ माणूसमारे, विकास कुलकर्णी ,अमर डागा,अशोकराव शेटे हे सद्भावना मित्रमंडळाचे सदस्य आणि मुंदडा परिवाराने परिश्रम घेतले. कार्यक्रमात शहरातील मोठ्या संख्येने मान्यवर मोठया संख्येने उपस्थित होते.

## शरद पवारांची प्रकृती बिघडली...

तपासणीसाठी नेण्याचा निर्णय घेण्यात आला. सध्या शरद पवार यांचा ताफा वरवंड परिसराच्या जवळ असल्याची माहिती असून, पुढील पाऊण तासात ते रुबी हॉल क्लिनिकमध्ये पोहोचण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. दरम्यान, रुग्णालय प्रशासनाने विशेष वैद्यकीय पथक तैनात ठेवले असून आवश्यक त्या सर्व तयारी करण्यात आल्या आहेत.शरद पवार यांच्यासोबत खासदार सुप्रिया सुळे देखील असल्याचे समजते आहे. पवार रुग्णालयात दाखल होणार असल्याची माहिती मिळताच रुबी हॉल क्लिनिक परिसरात कार्यकर्ते आणि समर्थक जमा होण्याची शक्यता आहे. त्यामुळे सुरक्षेच्या कारणास्तव रुग्णालयाबाहेर पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त तैनात करण्यात येत आहे. शरद पवार यांच्या प्रकृतीबाबतची अधिकृत माहिती डॉक्टरांच्या सखोल तपासणीनंतरच समोर येणार असून, त्यांच्या तब्येतीकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

## धांडे नगरच्या नाला कामाला सुरुवात...

पाणीच-पाणी झाल्याने या भागातील नागरिकांचे प्रचंड नुकसान आणि हाल झाले होते. केवळ मोठ्या नाल्याचे काम रखडल्याने त्या ठिकाणी अशी परिस्थिती निर्माण झाली होती. यासंदर्भात राष्ट्रवादीचे झुंजार धांडे यांनी सातत्याने पाठपुरावा करून नाला काम त्वरित करावे अशी मागणी सुरूवातीपासून लावून धरली होती. विशेष म्हणजे पाच वर्षांपासून हे काम रखडले होते. अखेर आ.विजयसिंह पंडित यांच्या नेतृत्वाखाली आणि नगराध्यक्षा प्रेमलताताई पारवे यांच्या मार्गदर्शनाखाली आज प्रत्यक्ष नाला कामाला सुरूवात झाली आहे. मुख्याधिकारी शैलेश फडसे, नगराध्यक्ष प्रतिनिधी शेख मुजीबभाई, उपनगराध्यक्ष विनोद मुळूक यांनी हा प्रश्न मनावर घेतल्यामुळेच सोमवारी ( दि.९ ) त्यांच्या उपस्थितीत प्रत्यक्ष कामाला देखील सुरूवात झाली असून तब्बल पाच ते सात वर्षांपासून रखडलेला हा प्रश्न आता मार्गी लागत असल्याने नागरिकांमधून देखील समाधान व्यक्त होत आहे. बीड शहरातील बार्शी रोडवरील धांडे नगरमधील मोठ्या नाल्याच्या कामाला सोमवार ( दि.९ ) सुरूवात झाली. मुख्याधिकारी फडसे यांच्यासह शेख मुजीबभाई, विनोद मुळूक, सिताई कन्ट्रक्शनचे रंजीत क्षीरसागर, झुंजार धांडे व धांडे नगरमधील नागरिकांच्या उपस्थितीमध्ये आज सकाळी प्रत्यक्ष कामाला सुरूवात झाली आहे. दोन दिवसापुर्वीच याठिकाणी मुख्य नाला कामाचे मोजमाप आणि मार्कींग झाले होते. त्यानंतर आज प्रत्यक्ष कामाला सुरूवात झाल्याने नागरिकांमधून समाधान व्यक्त होत आहे. या नाल्याचे काम तातडीने व्हावे यासाठी झुंजार धांडे यांनी सुरूवातीपासून ते प्रत्यक्ष काम होईपर्यंत पाठपुरावा केलेला आहे.

## माजलगावच्या लेखी जि.प.निवडणुकीत विजयी

माजी आमदार राधाकृष्ण अण्णा होके पाटील माजी नगराध्यक्ष अशोकराव होके पाटील यांची पुतणी आणि राजेभाऊ होके पाटील यांची कन्या दिपालीताई अजयराव चौधरी या अजित पवार राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीकडून बोरी जि.प. गटातून प्रचंड मताधिके घेऊन विजयी झाल्या आहेत तर माजलगाव बाजार समितीचे माजी उपसभापती सुखदेवराव लंगडे यांची कन्या आणि नगरसेवक राहुल लंगडे यांची बहीण सौ.सुचिताताई आनंदराव भरोसे या बोबडे टाकळी जिल्हा परिषद गटातून शिवसेने कडून प्रचंड मताधिके घेऊन विजयी झाले आहेत या दोन्ही माजलगावच्या लेकी परभणी जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत विजयी झाल्यामुळे त्यांचे माहेर असलेल्या माजलगावात आनंद उत्सव साजरा होत आहे व त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन केले जात आहे.

## सोनं स्वस्त झालं, चांदीचा दरही घसरला!

मुंबई दि.९ (प्रतिनिधी):- भारतात ९ फेब्रुवारी रोजी २४ कॅरेट सोन्याच्या प्रति ग्रॅमचा दर १५,६५९ रुपये, २२ कॅरेट सोन्याच्या प्रति ग्रॅमचा दर १४,३५४ रुपये आणि १८ कॅरेट सोन्याच्या प्रति ग्रॅमचा दर ११,७४४ रुपये आहे. भारतात ९ फेब्रुवारी रोजी २२ कॅरेट सोन्याच्या प्रति १० ग्रॅमचा दर १,४३,५४० रुपये, २४ कॅरेट सोन्याच्या प्रति १० ग्रॅमचा दर १,५६,५९० रुपये आणि १८ कॅरेट सोन्याच्या प्रति १० ग्रॅमचा दर १,१७,४४० रुपये आहे. भारतात ९ फेब्रुवारी रोजी चांदीचा भाव प्रति ग्रॅम २८४.९० रुपये आणि प्रति किलोग्रॅम २,८४,९०० रुपये आहे.

## मनोजदादा जरांगे पाटील यांच्याकडून चंपावती महोत्सवातील बालकलाकारांना कौतुकाची थाप

# बीड जिल्ह्यातून चंपावती महोत्सवातील नृत्य स्पर्धेसाठी बालक पालकांची तोबा गर्दी!

बीड दि.९ (प्रतिनिधी):- अनिलदादा जगताप फाउंडेशन व शिवसेना बीड आयोजित चंपावती महोत्सव उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे महाकरंडकाच्या या रंगमंचावरून मी उपमुख्यमंत्री मा.एकनाथ शिंदे साहेबांना वाढदिवसाच्या मनःपूर्वक शुभेच्छा देतो. बीडच्या मातीतून घडणाऱ्या बालकलाकारांना हा महोत्सव नवी दिशा देणारा ठरो. चंपावती महोत्सवाच्या माध्यमातून बीडमधून असंख्य गुणवंत कलाकार घडू देत आणि बीड जिल्ह्याचे नाव राज्यभर मोठं व्हावं, अशी सदिच्छा व प्रार्थना व्यक्त करत संघर्ष योद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांनी बालकलाकारांचे मनोबल वाढवले. दि. २ फेब्रुवारीपासून बीड येथे सुरू असलेल्या या महोत्सवांतर्गत शिशुगट समूह नृत्य स्पर्धा व वैयक्तिक नृत्य स्पर्धा (इंग्रजी माध्यम) यांचा उद्घाटन सोहळा काल दि. ९ फेब्रुवारी रोजी पार पडला. या सोहळ्याचे उद्घाटन मनोज दादा जरांगे पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल दादा जगताप तसेच शिवसेनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते व कला रसिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाची प्रस्तावना चंपावती महोत्सवाचे संस्थापक अध्यक्ष प्रतीक कांबळे यांनी करून महोत्सवाची सविस्तर माहिती उपस्थितांना दिली. आपल्या भाषणात अनिल दादा जगताप यांनी सांस्कृतिक रंगमंचावर बालकलाकारांचे कौतुक करण्यासाठी मनोज दादा जरांगे पाटील यांची उपस्थिती लाभल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

या उद्घाटन सोहळ्याला सरपंच पांडुरंग तारक, धनंजय देशमुख, बबनराव गवते, बळीराम गवते, झुंजार नेता चे संचालक आकाश वरपे सौ. विशाखा वरपे, ज्ञानराज



तारक, बद्रीनाथ तारक, श्रीराम कुनरकर, स्वप्निल तारक, जयदत्त थोटे, संजय गोडसे, युवराज मस्के, किरण भगत, लक्ष्मण नरनाळे, महेश तारक, गंगाधर काळकुटे, शंकर चव्हाण यांच्यासह असंख्य मराठा सेवक व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. चंपावती महोत्सवाच्या माध्यमातून बीडच्या सांस्कृतिक क्षेत्राला नवी दिशा मिळत असून बालकलाकारांच्या सुप्त कलागुणांना योग्य व्यासपीठ मिळत असल्याचे चित्र या उद्घाटन सोहळ्यातून पुन्हा एकदा अधोरेखित झाले.

# बारावी प्रमाणपत्र परीक्षा कॉपीमुक्त व भयमुक्त वातावरणात पार पाडाव्या, याकरिता गटशिक्षणाधिकारी समंदर पठाण यांनी केले यशस्वी नियोजन

बीड दि.९ (प्रतिनिधी):- आजपासून बारावी प्रमाणपत्र परीक्षा सुरू होत आहे शासनाच्या धोरणानुसार दहावी व बारावीची परीक्षा कॉपीमुक्त व भयमुक्त वातावरणात पार पडून खरी गुणवत्ता समोर यावी याकरिता शासनाने दिलेल्या निर्देशानुसार गटशिक्षणाधिकारी समंदर पठाण यांनी कठोर परिश्रम घेऊन गत आठ दिवसापासून यशस्वी नियोजन केले आहे, बैठकावर बैठका घेतल्या, कॉपीबहादरांना आळा बसवण्यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना राबविल्या प्रत्येक परीक्षक केंद्रावर सीसीटीव्ही आहेत का याची स्वतः खातर जमा केली , ज्या केंद्रावर सीसीटीव्ही नाही तेथील शिक्षकांचे दुसरा महाविद्यालयात स्थलांतर केले, एवढेच नव्हे तर कॉपी करताना किंवा गैरवर्तन करतांना कोणी आढळल्यास त्यावर शासनाच्या निर्देशानुसार कठोर कारवाई केली जाईल असा सज्जड दमही दिला.

बीड जिल्ह्याला लागलेली कॉफीची कीड मुळासह नष्ट करण्यासाठी, शासनाच्या धोरणानुसार मा.जिल्हाधिकारी व मा.सि.ओ. साहेबांच्या मार्गदर्शनाखाली कठोर भुमीका घेण्यात आली,बीड पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी समंदर पठाण साहेब यांनी मा.शासनाच्या आदेशाचे तंतोतंत पालन करीत बीड तालुक्यामध्ये सर्वच परिक्षाकेंद्रावर करडी नजर ठेवण्याची कठोर भूमिका घेतली, प्रत्येक परीक्षा केंद्रावर सीसीटीव्ही कॅमेरे बसवा असा आग्रह धरला, ज्या ठिकाणी कॅमेरे बसविले नाही तेथील शिक्षक इतरत्र स्थलांतरणाची कठोर भूमिका घेतली व त्याप्रमाणे कारवाई केली, केंद्र संचालकांच्या बैठकही घेतल्या, त्यांना शासनाचे ध्येय धोरण समजावून सांगितले, दहावी आणि बारावीची परीक्षा संपे पर्यंत मी स्वस्त बसणार नाही, प्रत्येक केंद्रावर माझे लक्ष असणार आहे ,जर कोणी गैर्तव्यतन केले तर त्याला माफी नाही, असा सज्जड दम ही दिला असून ,यावर्षी मी बीड तालुक्यामध्ये कॉपीमुक्त वातावरणात परिक्षा घेऊनच दाखवणार अशी सिंहगर्ज केली.

पान ६ वरून

## ३५ किमी सुरक्षित वायरअभावी नागरिक व

तुटणे, पार्किंग परिसरात अपघात होण्याच्या घटना वारंवार घडत आहेत. याचा धोका नागरिकांइतकाच महावितरणच्या कर्मचाऱ्यांनाही अधिक आहे. कोणतीही आधुनिक सुरक्षित व्यवस्था नसताना हे कर्मचारी खांबावर चढून जीव धोक्यात घालून वीजपुरवठा सुरळीत ठेवण्याचे काम करत आहेत. मात्र या गंभीर बाबीकडे लोकप्रतिनिधींचे दुर्लक्ष होत असल्याची भावना नागरिकांतून व्यक्त केली जात आहे.शहरातील काळा हनुमान ठाणा डीपीसह इतर ३२ महत्त्वाच्या ठिकाणच्या डीपींवर तातडीने एअर बंच केबल बसवण्याची आवश्यकता असून, यासाठी लोकप्रतिनिधींनी पुढाकार घेऊन बीड येथील महावितरणच्या कार्यकारी अभियंत्यांकडे प्रभावी पाठपुरावा करावा, अशी जोरदार मागणी पाटोदा शहरातून होत आहे.

## राज्यस्तरीय ग्रंथमित्र पुरस्काराने डॉ.राजेंद्र सानप सन्मानित

ग्रंथालय संचालक सुनील हुसे यांच्या हस्ते देवुन सन्मानित करण्यात आले. यावेळी राज्य ग्रंथालय संघाचे माजी अध्यक्ष प्राचार्य डॉ रामेश्वर पवार, मराठवाडा विभाग ग्रंथालय संघ अध्यक्ष खंडेराव सरनाईक,कार्यवाह राम मेकले,प्रा डॉ राजेंद्र कुंभार,डॉ सुभाष चव्हाण,धर्मराज वीर,व ग सुर्यवंशी यांच्यासह असंख्य मान्यवरांच्या उपस्थितीत होते गेल्या ३५वर्षापासुन ग्रंथालय क्षेत्रात रचनात्मक कार्य करणाऱ्या ग्रंथप्रेमी डॉ राजेंद्र सानप यांना राज्यस्तरीय ग्रंथमित्र या पुरस्कार मिळाल्याबद्दल विविध क्षेत्रातुन त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

## आ.नमिताताई यांनी मागणी करताच हज यात्रेकरूची

यामुळे अंबाजोगाई येथील रुग्णालयाने तपासणी करण्यास असमर्थता दर्शवली होती. अंबाजोगाईपासून बीडचे अंतर १०० किलोमीटर असल्याने वृद्ध भाविकांना शारीरिक आणि आर्थिक त्रास सहन कराव लागत होता. ही बाब स्थानिक प्रसारमाध्यमांनी उघडकीस आणल्यानंतर आ. नमिता मुंदडा यांनी तात्काळ दखल घेतली.आमदार मुंदडा यांनी सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश अबिटकर यांना लेखी पत्र देऊन ही अन्यायकारक अट शिथिल करण्याची मागणी केली होती. त्यांच्या या मागणीची दखल घेत प्रशासनाने सकारात्मक निर्णय घेतला आहे. आता बीड जिल्हा शल्यचिकित्सकांच्या आयडीचा समन्वय साधून अंबाजोगाईतच तपासणी प्रक्रिया पूर्ण केली जाणार आहे. या संदर्भात स्वाराती रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ.शंकर धपाटे यांनी अधिक माहिती देताना स्पष्ट केले की, जरी पासवर्ड जिल्हा स्तरावर असला तरी समन्वय साधून मंगळवारपासून स्थानिक पातळीवर तपासणी सुरू होईल. दरम्यान, या प्रक्रियेसाठी ऑनलाईन नोंदणी बंधनकारक असल्याचे त्यांनी सांगितले.

## विनायक लाड यांचे निधन

यलीगार (लाड) वय वर्षे ५४ हे सर्व क्षेत्रातील लोकांच्या मनातील रॉयल हिरो म्हणून ओळखले जायचे. विनायक अण्णा यलीगार हे सातत्याने गरजवंत व अडचणीत सापडलेल्या लोकांच्या मदतीला नेहमी धावून जात असत. ते युवानेते विजय यलीगार यांचे बंधू होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, आई, भाऊ असा मोठा परिवार आहे. लाड कुटुंबियांच्या दुःखात पार्श्वभूमी परिवार सहभागी आहे.

## मच्छिंद्रनाथ संजीवन समाधी सोहळ्याच्या तयारीचा आढावा

महसूल, आरोग्य, सार्वजनिक बांधकाम, वीज वितरण, पाणीपुरवठा तसेच इतर सर्व संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते. ठकीत भाविकांच्या सोयीसुविधांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. यामध्ये दर्शन रांग व्यवस्था, व्हीआयपी दर्शन व्यवस्था, पार्किंग व्यवस्था, मोफत अन्नदान, कावड व्यवस्था, मळी काढणे, सुरक्षा व्यवस्था, विद्युत व पाणीपुरवठा, आरोग्य सेवा तसेच इतर आवश्यक व्यवस्थांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. भाविकांना कोणतीही गैरसोय होऊ नये यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने व जबाबदारीने काम करण्याच्या सूचना देण्यात आल्या.गुढीपाडव्याच्या पूर्वसंध्येला संजीवन समाधी उघडण्यात आल्यानंतर दुसऱ्या दिवशी सूर्योदयापूर्वी ती पुन्हा झाकण्यात येते. या कालावधीत मच्छिंद्रनाथांच्या संजीवन समाधीवर गंगाजल व चंदनाने अभिषेक करण्यात येतो. यावेळी मोठी यात्रा भरत असून हा सोहळा नाथभक्तांसाठी श्रद्धा व भक्तीचा केंद्रबिंदू ठरतो.नाथ संप्रदायातील ही प्राचीन अध्यात्मिक परंपरा श्रद्धा व भक्तीचे प्रतीक मानली जाते. श्री क्षेत्र मच्छिंद्रनाथ गड, सावरगाव मायंबा हे नाथ संप्रदायातील अत्यंत महत्त्वाचे तीर्थक्षेत्र असून या संजीवन समाधी सोहळ्याला विशेष धार्मिक महत्त्व आहे.

## माजलगावच्या सिध्देश्वर मंदिरात साप्ताहिक रूद्रचैतन्य जागर

आरती तर अखंड रूद्राभिषेक तर पालखी नगर प्रदक्षिणा संध्याकाळी होणार आहे. दि. १६ सोमवारी रात्री मल्हार शेळगावकर यांचे हरिकिर्तन आणि महाप्रसाद होणार आहे. या साप्ताहिक रूद्रचैतन्य जागराचा सर्व भाविक - भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन सुकाणू समिती सिध्देश्वर भक्त मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

## माजलगावात मंगलनाथ मंदिरात शिवमहापुराण कथाचे आयोजन

संत सितारामजी महाराज यांच्या आशिर्वादाने मंगलनाथ यात्रा महोत्सवात शिवमहापुराण कथेची सुरूवात दि. ११ फेब्रुवारीपासुन होणार असुन दि. १६ फेब्रुवारीला कथेची सांगता होणार आहे. कथा प्रवक्ते दण्डी स्वामी अनंत श्रीविभुषीत श्रीमत्परमहंस श्री. श्री. हरिहरानंद भारती स्वामीजी हे असुन कथेचे व महाप्रसादाचे यजमान बालासाहेब बाबुराव गिरी हे आहेत. दि. १६ कथेच्या सांगतेनंतर दु. १ नंतर महाप्रसादाचे वाटप करण्यात येणार असुन या कथा श्रवणाचा व महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन पुजारी ज्ञानेश्वर जाधव यांचे वतीने करण्यात आले आहे.

## घोगस पारगावमध्ये गाळमुक्त योजनेअंतर्गत

अशी मागणी केली होती. त्यानुसार चौकशी समिती मध्ये माजलगाव चे गटविकास अधिकारी व आंबेजोगाई येथील विस्ताराधिकारी यांनी पाहणी केली असता गाळ काढला नसेल याची निदर्शनास आले मात्र अध्यापर्यंतही कुठलीच कार्यवाही झाली नसून ती करावी अशी मागणी नम्रता धनंजय गर्कळ यांनी केली आहे.याबाबत अधिक माहिती अशी की शासनाच्या गाळमुक्त धोरण व गाळयुक्त शिवार योजनेअंतर्गत शिरूर कासार तालुक्यातील घोगस पारगाव मध्ये मोठा भ्रष्टाचार झाला असून तब्बल अकरा लाख ८४ हजार रुपये इतकी रक्कम पाझर तलाव क्रमांक १, क्रमांक २, क्रमांक ३ यातील गाळ काढल्याचे दाखवून कुठलेच काम न करता हि रक्कम उचललीआहे.विशेष म्हणजे यामध्ये ग्रामसेवक प्रभाकर मिसाळ, उपसरपंच बबन गर्कळ ग्रामपंचायत सदस्य तसेच ग्रामरोजगार सेवक यांनी यामध्ये आपला हात साफ करून घेतला आहे . सरपंच अमृता धनंजय गर्कळ यांची दिशाभूल करून या धनादेशावर सह्या करून घेतल्या त्यामुळे याबाबत त्यांनी जि प चे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना लेखी तक्रार देऊन याबाबत चौकशी लावली त्यामध्ये माजलगावचे गटविकास अधिकारी जोशना मुळीक तसेच आंबेजोगाईचे विस्तार अधिकारी गुळभिले यांच्यामार्फत चौकशीही झाली मात्र या दोषींवर अद्याप पर्यंत कार्यवाही झाले नसल्याने सरपंच व गावकऱ्यांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे लवकरच याबाबतीत जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांची भेट घेणार असल्याचेही सरपंच अमृता धनंजय गर्कळ यांनी म्हटले आहे .

## महिला सरपंचांना शिवीगाळ करून दिली धमकी, गुन्हा दाखल

सदर प्रकरणाची चौकशी का लावली म्हणून घोगस पारगाव च्या महिला सरपंच अमृता धनंजय गर्कळ या दिनांक २४- १ -२०२६ रोजी स्कुटी वरून घराकडे जात असताना ग्रामपंचायत सदस्य अर्जुन नागरी, प्रदीप नागरे, बाळासाहेब गर्कळ यांनी माझी स्कुटी आढळून तुझ्याकडे व तुझ्या पतीकडे बघून घेऊ आमच्याही मोठ्या ओळखी आहेत पोलीस स्टेशन कडून आमचे काही वाकडे होत नाही उलट आम्हीच अनेकांना खोट्या गुन्ह्यात आतापर्यंत अडकवले आहे तुम्हालाही आम्ही खोट्या गुन्ह्यात अडकवू अशी अर्वाचे भाषेत शिवगाळ करून धमकी दिली याप्रकरणी सरपंच अमृता गर्कळ यांनी चकलांबा पोलीस ठाण्यात तक्रार दिली असून या प्रकरणी गुन्हा दाखल झाला आहे.

आमच्या नावाने पैसे उचलल्याने उपसरपंच ,ग्रामसेवक, ग्राम रोजगार सेवक यांच्यावर कारवाई करा

घोगस पारगाव या ठिकाणी कुठल्याच प्रकारचा गाळ काढला नसून आमच्या नावाने उपसरपंच बबन एकनाथ गर्कळ ग्रामसेवक प्रभाकर मिसाळ, व ग्रामरोजगार सेवक तसेच ग्रामपंचायत सदस्य यांनी परस्पर बनावट कागदपत्रे तयार करून शासनाच्या निधीचा अपहार केला आहे आमच्या नावाने ही रक्कम उचली असून याचा आम्हाला आतापर्यंत थांग पत्ता लागलेला नव्हता आता आम्हाला समजल्यामुळे या सर्वांवर कायदेशीर कारवाई करावी अशी मागणी पोलीस अधीक्षक कावत यांच्याकडे भागवत भगवान गर्कळ ,महादेव गर्कळ ,कृष्णा गर्कळ या शेतकऱ्यांनी एका निवेदनाद्वारे केली आहे.

## जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेच्या

स्वच्छतेसाठी कचराकुंड्या, शाळा परिसरात हाय मॅक्स लाईट तसेच विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी सर्व वर्गांमध्ये व शाळा परिसरात एकूण २७सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. सर्व सोयीसुविधांनी सुसज्ज असलेली जामगाव येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे केंद्रबिंदू बनत असल्याचे मत यावेळी उपस्थितांनी व्यक्त केले.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक,संपादक गंमत भंडारी यांनी शाम प्रिंटर्स, नवी भाजी मंडई बीड येथे छापून पार्श्वभूमी कार्यालय, नवी भाजी मंडई रोड, बीड येथे प्रकाशित केले. फोन नं. (०२४४२) २३०१०१.
AR/TECH/Regd. N.P./34/Beed/99-2000 RNI Regd.no. MAHMAR/1990/501 E-mail Address-parshvabhoomi@gmail.com

# पार्श्वभूमी

दिनांक १० फेब्रुवारी २०२६ पान -३


## शेतकरी आत्मलिंग गुजर यांच्या आत्महत्या बाबत सर्वत्र हळहळ

केज दि ९ (प्रतिनिधी) - तालुक्यातील धनेगाव येथील शेतकरी आत्मलिंग नामदेव गुजर यांनी फाशी घेऊन आत्महत्या केल्याने सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे. शनिवारी सायंकाळी वाजण्याच्या दरम्यान मांजरा धरण क्षेत्राच्या डाव्या कालव्याच्या लोखंडी रॅम्पला ४४ वर्ष वयाचे शेतकरी आत्मलिंग गुजर यांनी गळफास घेवून आत्महत्या केल्याची घटना घडली. या घटनेची माहिती समजताच सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात होती. त्यांच्या पार्थिवाची युसूफ वडगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात उत्तरीय तपासणी करण्यात आली त्यानंतर रविवार आठ फेब्रुवारी रोजी दुपारी १.३० वाजता त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्च्यात २ मुली, आई, वडील, पत्नी असा परिवार आहे. त्यांच्या आत्महत्येचे कारण अद्याप समजू शकले नाही.



## प्लास्टिक मुक्ती करायची असेल तर दंडाचा बडगा व्यापाऱ्यासह ग्राहकांवर देखील उगारण्याची गरज

बीड दि ९(प्रतिनिधी) - पर्यावरणासाठी प्लास्टिक किती घातक आहे ,हे शासनाचे संबंधित खाते वारंवार सांगत आहे. प्लास्टिक मुक्ती साठी शासनाने नवीन नवीन योजना काढल्या परंतु त्या योजना राबवण्याअभावी प्लास्टिक मुक्तीचा फज्या उडाल्याचे चित्र महाराष्ट्रात सर्वत्र दिसत आहे. यात बीड जिल्हा नवीन नाही. प्लास्टिक मुक्ती करण्यासाठी व प्लास्टिक वापरणाऱ्यावर कारवाईचे सर्वाधिक अधिकार ग्रामपंचायत नगरपालिका महानगरपालिका यांना दिलेले असताना बीड नगरपालिका मात्र पावसाळ्यापूर्वी प्लास्टिक संदर्भात मोहीम राबवते .बाकी आठ दहा महिने प्लास्टिक वापरणाऱ्यांना व विक्रेत्याना मुक्त संधी देते. यामुळे बीड शहरातील गल्लोगल्लीच्या नाल्या पाण्याऐवजी प्लास्टिकने भरलेल्या दिसून येतात. हे चित्र सर्वत्र असताना कुणीतरी प्लास्टिक मुक्ती साठी आपले मत व्यक्त केले. त्याच्या मतानुसार प्लास्टिक विक्रेत्यांबरोबरच त्याचा वापर करणाऱ्या नागरिकावर जर दंडात्मक कारवाया झाल्या तर नक्कीच याचा मोठा परिणाम जाणवेल असे एकीकडचे चित्र असताना हा प्रकार म्हणजे दारू उत्पादनाला लायसन आणि पिणाऱ्यावर कारवाई अशा प्रकारचं मत देखील व्यक्त केलं जाऊ लागल आहे. परंतु प्लास्टिक पिशव्यांमध्ये वस्तू देणाऱ्या विक्रेत्यासह ज्याच्या हातात पिशव्या दिसतील त्याच्यावर दंडात्मक कारवाई करण्याचा प्रयोग नगरपालिकेने करायला काय हरकत आहे. असे मत देखील व्यक्त केले जाऊ लागले आहे.

प्लास्टिक मुक्ती साठी बीड नगरपालिकेने पथक तयार केलेले असल्याचे सांगण्यात येते परंतु हे पथक केवळ नावापुरते काम करीत असल्याचे अनेकदा समोर आलेले आहे. बीड शहरामध्ये प्लास्टिक शिवाय वस्तूची ने-आन होतच नाही. विक्रेता सढळ हाताने प्लास्टिक पिशव्यांमधून वस्तू देतात, ग्राहक देखील प्लास्टिकच्या पिशव्याशिवाय दुकानातील माल घेत नाहीत हे स्पष्ट चित्र आहे. बीड नगर परिषदेच्या वतीने शहर प्लास्टिक कॅरीबॅग मुक्त करण्यासाठी विविध स्तरावर प्रयत्न केले जात असताना दिसून येतात परंतु त्याचा प्रभाव मात्र पडलेला नाही. प्लास्टिक मुक्तीसाठी शाळकरी मुलांच्या रॅली काढण्यात आल्या. प्लास्टिक मुक्तीचा संदेश देण्यात आला. काही दुकानदारावर प्लास्टिक वापरल्या बाबत कारवाया




देखील करण्यात आल्या, परंतु हाती मात्र यश आले नाही. शहरातील गल्लोगल्लीच्या नाल्यासह रस्त्यावर प्लास्टिक श दिसून येते . शहरातील नाल्या तर पाण्याऐवजी प्लास्टिकच्या पिशव्या आणि प्लास्टिकच्या बाटल्याने पूर्ण भरून गेलेल्या दिसून येतात . नगरपालिका जेसीबीच्या साह्याने आशा टॉकीज परिसरातील मोठ्या नाल्यातील कचरा काढण्याचे काम करताना दिसून येते. परंतु गाळ तर येतच नाही प्लास्टिकच्या पिशव्या आणि प्लास्टिकच्या बाटल्या या मधूनच ट्रॅक्टर भरले जाते .तीच परिस्थिती शहरातील सर्व भागात आहे याला जबाबदार कोण ? असाही प्रश्न समोर येऊ लागला आहे . असे असताना प्लास्टिक मुक्ती साठी, आता केवळ दुकानदारांसह थेट प्लास्टिक वापरणाऱ्या नागरिकांनाच दंड ठोठावण्याची मागणी जोर धरत असल्याचे सोशल मीडियावर या संदर्भात आलेल्या टिप्पणीत नमूद केले आहे.

प्लास्टिक मुक्तीसाठी होत असलेली कारवाई प्रामुख्याने विक्रेते आणि दुकानदारांवर केंद्रित आहे. मात्र, जाणकारांच्या मते, जोपर्यंत ग्राहक स्वतःहून प्लास्टिक पिशवी मागणे बंद करत नाही, तोपर्यंत ही साखळी तुटणार नाही. जर प्रशासनाने ''ज्याच्या हातात प्लास्टिक पिशवी, त्याला दंड'' हे धोरण कडकपणे राबवले, तर भीतीपोटी नागरिक घरातून कापडी पिशवी घेऊन बाहेर पडतील. शहरातील विविध चौकांमध्ये आणि बाजारपेठेत फिरणाऱ्या नागरिकांच्या हातात जर प्रतिबंधित प्लास्टिक कॅरीबॅग आढळली, तर त्यांना जागीच दंड करण्यात यावा. यामुळे जेव्हा ग्राहकाला दंड भरण्याची वेळ येईल, तेव्हा तो दुकानदाराकडे प्लास्टिक पिशवीचा आग्रह धरणार नाही. व दुकानदार देखील सामान प्लास्टिकच्या पिशवीत देणार नाही. कॅरीबॅग ची मागणी घटली की पुरवठा आपोआप बंद होईल आणि बीड शहर खऱ्या अर्थाने प्लास्टिकमुक्त होईल. असे मत देखील या निमित्तने व्यक्त केले जात आहे. परंतु शासनाने कितीही चांगल्या योजना काढलेल्या असल्या तरी किंवा त्या योजना कशा प्रकारे राबवल्या जाव्यात या संदर्भात तज्ञ व्यक्तींनी मत व्यक्त केले तरी संबंधित यंत्रणाच्या बेफिकिरपणे व दुर्लक्षाने किंवा इतर कोणत्याही भीतीयुक्त कारणाने सदर योजनेचा फज्या उडाल्याचे अनेकदा समोर आले आहे. सद्यस्थितीला राज्यातील काही नगरपालिका व महानगरपालिका प्लास्टिक मुक्तीसाठी शंभर टक्के प्रयत्न करीत असल्याने त्या शहरांमध्ये कॅरीबॅग कुठेही मिळत नाही किंवा कोणताही ग्राहक , दुकानदार कॅरीबॅगचा वापर करत नाही .परंतु बीडमध्ये सकाळी कारवाई केली तर दुपारच्याला त्याच दुकानांमधून कॅरीबॅग मिळतात हे चित्र आहे .हे चित्र पालटण्यासाठी बीड नगरपालिकेने कठोर कारवाई हाती घेणे गरजेचे आहे . यासाठी प्लास्टिक साठा करणाऱ्या ठोक विक्रेत्यासह कॅरीबॅग मधून माल विक्री करणाऱ्या आणि कॅरीबॅग मधून वस्तू व मालाची वाहतूक करणाऱ्या खरेदीदार अर्थात ग्राहकावर जबर अशी दंडात्मक कारवाई चालवली तर कोणीही प्लास्टिकच्या पिशव्यांची मागणी करणार नाही

किंवा विक्रेता आपला माल प्लास्टिकच्या पिशव्या मधून देण्याचे धाडस करणार नाही. परंतु यासाठी नगरपालिकेच्या मुख्याधिकाऱ्यासह त्यांच्या यंत्रणेने प्रामाणिकपणे काम करण्याची गरज आहे . विशेष म्हणजे यासाठी नगरपालिकेच्या नगराध्यक्षासह नगरसेवकांनी कारवाई करताना कसल्याही प्रकारचा हस्तक्षेप केला नाही पाहिजे. तरच मुख्याधिकारी कठोरपणे अशा कारवाया करतील हे देखील तेवढेच खरे आहे.

## पोनि जोगदंड यांच्याकडून नशा मुक्तीसाठी प्रयत्न सुरू




अंबाजोगाई दि ९ (प्रतिनिधी) - एकीकडे अवैध धंदे म्हणून पोलीस खात्यातील काही लोक बेकायदेशीर चालणाऱ्या हातभट्टी तसेच विनापरवाना देसी विदेशी दारू विक्री करणाऱ्या कडून हप् ? वसुली करते . असे एक इकडचे चित्र असताना दुसरीकडे मात्र काही पोलीस अधिकारी नशा मुक्तीसाठी आपला वेळ देत आहेत त्यापैकी एक असलेले पोलीस निरीक्षक शरद जोगदंड यांच्या नावाची आता सर्वत्र चर्चा होऊ लागली आहे.अंबाजोगाई शहर व परिसरामध्ये मोठ्या प्रमाणात हातभट्टीची दारू उत्पादित केली जाते तसेच बेकायदेशीरपणे तिची विक्री देखील होते पोलीस यंत्रणा असो की दारूबंदी खाते असो हे सतत कारवाया करतात परंतु अद्याप पर्यंत अंबाजोगाई शहर व तालुक्यातील बेकायदेशीर दारू उत्पादन व विक्री बंद झालेली नाही असे असतानाच अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक शरद जोगदंड हे नशा मुक्ती जनजागृती अभियान राबवत आहेत .सर्व सार्वजनिक ठिकाणी स्वतः उपस्थित राहत जनजागृती करत आहेत. नशा करण्यामुळे युवकांच्या पिढ्यान पिढ्या बरबाद होत आहेत. अनेक कुटुंबे ही उध्वस्त होत आहेत .अंबाजोगाई शहर पोलीस स्टेशनं च्या माध्यमातून सामाजिक जान ठेवत ''व्यसनाला नाही, आरोग्याला होकार ''नशा मुक्ती जनजागृती अभियानातून त्यांनी हे काम चालवले आहे. विशेषत पोलीस निरीक्षक शरद जोगदंड स्वतः या अभियानात विशेष लक्ष देत जनजागृती करत असल्याने त्याचा परिणाम नशा करणारा बरोबरच इतरावर देखील होऊ लागला आहे एक खमका पोलीस अधिकारी पोलिसांचा दंडुका दाखवण्याऐवजी नशा मुक्तीसाठी कार्य करत असल्याबद्दल त्यांच्या कामकाज पद्धतीचा सर्वत्र उल्लेख होऊ लागला ज्यामुळे अंबाजोगाईतील नशेच्या आहारी गेलेले युवक नागरिक नशा मुक्तीचा रस्ता धरतील असे अपेक्षा देखील व्यक्त केली जात आहे.

## हज यात्रेकरूंची आरोग्य तपासणी स्वराती मध्येच करावी-खा.बजरंगबप्पा

अंबाजोगाई दि ९(प्रतिनिधी)- पवित्र हज यात्रेसाठी जाणाऱ्या भाविकांच्या वैद्यकीय तपासणी अंबाजोगाईच्या एस.आर. टी. आर. रुग्णालयात करावी अशी मागणी केज मतदार संघाचे आमदार विमलताई मुंदडा यांनी केल्यानंतर पुन्हा एकदा या मागणीसाठी जिल्ह्याचे खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांनी जोर लावला आहे. या संदर्भात माहिती असे की येथील स्वराती रुग्णालयामध्ये सर्व प्रकारची व्यवस्था असताना सुद्धा यावर्षी शासनाने पोर्टल ॲप द्वारे ऑनलाईन प्रक्रिया केल्यामुळे पासवर्ड सी.एस. कडे देण्यात आला. यामुळे अंबाजोगाई सह इतर तालुक्यातील हज यात्रे करू भाविकाची वैद्यकीय तपासणी अंबाजोगाईच्या शासकीय रुग्णालयात होऊ शकली नाही. यामुळे केजच्या आमदार नमितानाताई मुंदडा यांनी राज्याच्या आरोग्यमंत्र्यांना लेखी पत्र देऊन ही सोय अंबाजोगाई येथे करण्याची मागणी केली. त्यानंतर ही बाब पुन्हा एकदा कॉंग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष अमर देशमुख यांनी बीड जिल्ह्याचे खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर हा बजरंग बाप्पांनी सुद्धा आरोग्यमंत्र्यांना लेखी पत्र देऊन हज यात्रेकरूंची वैद्यकीय तपासणी अंबाजोगाई येथेच करण्यात यावी अशी मागणी केली .

## आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकरजी गरिब लोकांनी जगावे की मरावे ?-शेख युनुस

बीड दि ९(प्रतिनिधी) - महाराष्ट्राचे माजी आरोग्य मंत्री तानाजी सावंत यांनी अडीच वर्षांपूर्वी याच महाराष्ट्र सरकारने शासकीय रुग्णालयांमध्ये मोफत उपचार सुरू केले होते. पण आता सध्याचे आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी हा निर्णय रद्द करून पूर्णपणे मोफत उपचारा ऐवजी शासकीय रुग्णालयात नोंदणी पासून ऑपरेशन पर्यंत फीस आकारणी करण्याचा निर्णय घेतला आहे हा निर्णय गोरगरिबांसठी अन्यायकारक आहे तेव्हा प्रत्येक योजनेत व्यावहारिक दृष्टिकोन ठेवून या सरकारला गरिबाला जगू द्यायचे आहे की नाही ? हा प्रश्न गरीब जनतेला पडला. आरोग्य मंत्री च्या



या निर्णयामुळे शासकीय रुग्णालयात पाऊल ठेवायचे तर सर्वात प्रथम दहा रुपये केस पेपर साठी दररोज द्यावे लागेल. प्रत्येक शस्त्रक्रियेसाठी पैसे मोजावे लागणार आहेत. एम आर आय स्कॅन साठी १ हजार ६०० रुपये द्यावे लागणार, तसेच साध्या पत्यारोपण शस्त्रक्रिया साठी ४० हजार रुपये द्यावे लागल. आणि मुले जन्म घालायला पण पैसे मोजावे लागणार. तेंव्हा साहेब जनतेने जगावे की मरावे ? बहिणीसाठी दर महिन्याला पैसे देणाऱ्या या सरकारने मात्र एकीकडून द्यायचे आणि दुसरीकडून दुपटीने वसूल करायचे असा व्यवहारीक दृष्टिकोन राबवणे चालवल्याने हे सरकार खरोखरच व्यापार चालवते की जनतेच्या सुखदुःखात सामील होते ? असा प्रश्न सर्वसामान्यांना पडला आहे. तेव्हा सरकारने पुन्हा एकदा या निर्णयाचा विचार करून सरकारी रुग्णालयात मोफत आरोग्य सेवा पुरवावी अशी जनतेची मागणी आहे .

## दोन हजार विद्यार्थ्यांनी दिली बीडच्या इतिहासाची परीक्षा

बीड दि ९(प्रतिनिधी) स्थानिक इतिहास प्रचाराच्या दृष्टीने महाराष्ट्रात केवळ बीड जिल्ह्यात झालेल्या बीड जिल्हा इतिहास प्रज्ञाशोध परीक्षा या उपक्रमात जवळपास दोन हजार विद्यार्थी सहभागी होऊन त्यांनी बीड जिल्ह्याच्या इतिहासाची परीक्षा दिली. इतिहासाच्या क्षेत्रात हा एक रेकॉर्ड समजला जातो.या उपक्रमामुळे बीड जिल्ह्याचा इतिहास घरोघरी पोहोचण्यास मोठी मदत होणार आहे.

बीड जिल्हा इतिहास परिषदेच्या वतीने आयोजित बीडचे प्रथम इतिहासकार डॉ. सतीश साळुंके यांच्या गोष्ट बीड जिल्ह्याच्या इतिहासाची या पुस्तकावर बीड जिल्ह्याच्या इतिहासाच्या परीक्षेचा हा उपक्रम होता. त्याला सर्व स्तरातून प्रचंड प्रतिसाद मिळाला. विशेष म्हणजे केवळ बीड तालुक्यापुरता हा उपक्रम राबवण्यात आला. बीड जिल्हा इतिहास प्रज्ञा शोध परीक्षेचे पुस्तक वैशिष्ठपूर्ण असून असा प्रामाणित सप्रमाण इतिहास आम्ही प्रथमच वाचत वाचून आवाक झालो असल्याची प्रतिक्रिया अनेक विद्यार्थी आणि शिक्षकांनी व्यक्त केली. हे पुस्तक डॉ. सतीश साळुंके यांनी लिहिला आहे. या प्रज्ञाशोध परीक्षेत चंपावती विद्यालय, भगवान विद्यालय, संस्कार विद्यालय,संस्कार इंग्लिश स्कूल बीड, शिवाजी विद्यालय, द्वारकादास मंत्री राजस्थानी विद्यालय, छत्रपती शाहू विद्यालय, आदर्श विद्यालय, ग्रामीण प्रशाला नेकनुर, जिल्हा परिषद प्रशाला चौसाळा, ज्ञानसाधना जीनियस स्कूल वडवणी, जिल्हा परिषद प्रशाला आर्वी, जिल्हा परिषद प्रशाला सात्रापोत्रा, जिल्हा परिषद प्रशाला पाचेगाव, बळवंतराव कदम माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय येळंबघाट, द.बा. घुमरे पब्लिक स्कूल बीड, जि प प्रशाला मस्साजोग, भालचंद्र विद्यालय लिंबागणेश, कै. बलभीमराव जाहेर पाटील विद्यालय नामलगाव व डॉ. नरेंद्र काळे प्रणित विविध शाळांच्या विद्यार्थ्यांनी या प्रज्ञाशोध परीक्षेत भाग घेतला. भविष्यात बीड जिल्हास्तरावर बीड इतिहास प्रज्ञाशोध परीक्षेचे आयोजन केले जाणार असून त्यात वीस हजार विद्यार्थी बसतील असा अंदाज इतिहास परिषदेचे कार्यवाह अण्णासाहेब गडदे आणि उपाध्यक्ष मंगेश रोटे यांनी व्यक्त केला. या परीक्षा १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिनानिमित्त घेतल्या जातील इतिहास परिषदेच्या वतीने त्यासाठी मोठ्या प्रमाणात तयारी सुरू केली आहे. बीड जिल्हा इतिहास प्रज्ञाशोध परीक्षा यशस्वी करण्यासाठी अण्णासाहेब गडदे, मंगेश रोटे, प्रशांत मुळे, सौ सुधा साळुंके, संस्कारचे शिक्षक श्याम गायकवाड, लिंबराज ठोंबरे, आशिष बुंदले यांच्यासह परिषदेचे सर्व कार्यकर्ते विविध शाळांचे मुख्याध्यापक संयोजक शिक्षक व इतिहास शिक्षकांनी परिश्रम केले घेतले.

## त्यागमुर्ती रमाबाई आंबेडकर जयंती फुलेनगर मध्ये उत्साहात साजरी

केज दि ९ (प्रतिनिधी) - महिलांचे आरोग्य शिबीर घेऊन त्यागमूर्ती रमाबाई आंबेडकर यांची जयंती शहरातील फुलेनगर भागात शनिवार दिनांक ७ फेब्रुवारी रोजी उत्साही वातावरणात साजरी करण्यात आली.

जयंतीनिमित्त म. फुले नगर, हाउसिंग कॉलनी येथे महिलांच्या विविध आरोग्य तपासण्या करण्यात आल्या. या प्रसंगी नगराध्यक्षा डॉ. सीताताई बनसोड यांची प्रमुख उपस्थिती होती तर महिलांच्या आरोग्य तपासणी शिबिराचे उद्घाटन नगर सेविका पद्मिन अक्का शिंदे, महानंदा ताई गायकवाड, प्रमिलाताई मस्के, प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले. यावेळी डॉ. प्रमीता कांबळे, मनिषाताई घुले, कविताताई कराड, ॲड. अनिता ताई मुंडे, अनिताताई कांबळे, संगीताताई साळवे, शीतलताई लांडगे, प्रियंकाताई लांडगे, तस्लिमा इनामदार, प्रियंका सुमेध शिंदे, मंदाकिनी घाडगे मॅडम, शारदाताई गुंड, विमलताई जोगदंड, सारिका ताई शिंदे वर्षा राख, प्रियांका शिंदे सह महिलांची उपस्थिती मोठ्या प्रमाणात होती.

## स्वप्नाली कांबळे व ऋषिकेश शिंदे विशेष प्राविण्याबद्दल सत्कारित

अंबाजोगाई दि ९ (प्रतिनिधी)-डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर संलग्नित मानवलोक समाजकार्य महाविद्यालय अंबाजोगाई येथे गांधी रिसर्च फाऊंडेशन जळगाव यांच्या वतीने ऑक्टोबर २०२५ मध्ये महाविद्यालयात घेण्यात आलेल्या गांधी विचार संस्कार परीक्षेत महाविद्यालयातील ६६ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता.या परीक्षेत स्तरावर प्राविण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांना सिल्वर, ब्रांझ मेडल व प्रमाणपत्र प्रदान केले आहेत. या मेडल व प्रमाणपत्राचे वितरण शनिवार दि. ०७ फेब्रुवारी २०२६ रोजी अंबाजोगाईचे सहाय्यक पोलिस अधिक्षक ऋषिकेश शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. यामध्ये एम.एस.डब्ल्यु. द्वितीय वर्षाची विद्यार्थीनी स्वप्नाली कांबळे द्वितीय क्रमांकाने उत्तीर्ण झाल्याबद्दल सिल्वर मेडल आणि प्रमाणपत्र देवून सन्मानीत करण्यात आले. तसेच एम.एस.डब्ल्यू. द्वितीय वर्षाचा विद्यार्थी तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाल्याबद्दल ब्रॉंझ मेडल आणि प्रमाणपत्र देवून सन्मानित करण्यात आले. जिल्हा स्तरावर प्राप्त केलेल्या यशाबद्दल महाविद्यालय प्रशासन, प्राचार्य, शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले आणि भावी जीवनासाठी शुभेच्छा दिल्या.

## पंचशील विद्यालयाच्या वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रमाला उत्स्फूर्त

(प्रतिनिधी) - शाळेत शिकणारी लहान लहान मुलं म्हणजे एका सुंदरशा बागेतली गोजिरवाणी रंगीबेरंगी फुलं असतात. त्यांना स्वच्छंद बागडण्याचा उडण्याचा खेळण्याचा निसर्गाने सर्वाधिकार दिलेला आहे. हीच मुलं हीच फुलं उद्याच्या उज्वल भारताच्या भविष्याची चाहूल आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांनी अभ्यासाला प्रथम प्राधान्य देत आपल्यातील कलागुणांना वाव दिला पाहिजे. केवळ डॉक्टर आणि इंजीनियरिंग अभ्यासक्रमाची ओढ ठेवण्यापेक्षा तुमच्यासमोर उभ्या असलेल्या विविध क्षेत्रातल्या स्वर्णिम संधीचा वेध घेण्यासाठी सरसावले पाहिजे, असे प्रतिपादन श्री संत नामदेव महाराज शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव, जेष्ठ पत्रकार, नांदेड मधील प्रसिद्ध उद्योजक आणि अभ्यासक डॉ. देवदत्त देशपांडे यांनी केले. नांदेडच्या महात्मा फुले शिक्षण प्रसारक मंडळ संचलित पंचशील विद्यालयाच्या वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. संस्थेच्या उपाध्यक्षा श्रीमती पंचफुलाबाई माणिकराव लोणे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होत्या.

## परळी येथे आयोजित महा पशुधन एक्सपोला शेतकरी बांधवांनी उपस्थित राहावे-शिराळे

बीड दि ९ (प्रतिनिधी)- -पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या पुढाकारातून आणि त्यांच्या विभागाच्या वतीने परळी येथे दि. १३ ते १५ फेब्रुवारी दरम्यान आयोजित केलेल्या महापशुधन एक्स्पो महामेळाव्यास शेतकऱ्यांनी व पशुपालकांनी यामध्ये मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन बीड जिल्हा भाजपाचे उपाध्यक्ष नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांनी केले आहे



. ना. पंकजाताई मुंडे यांनी सशक्त पशुधन बीड जिल्ह्यातील व राज्यातील शेतकरी पशुपालकांना नवनवीन पशुधनाची व त्यांच्या निगराणीविषयी तसेच या क्षेत्रातील नवनवीन तंत्रज्ञानाची माहिती व्हावी या करिता हे महापशुधन एक्स्पोचे आयोजन केले आहे या प्रदर्शनात १ हजार ५०० विविध प्रकारची उत्कृष्ट माहिती देण्यात येणार आहे. त्यामुळे या कार्यक्रमासाठी बीड जिल्ह्यातील तमाम शेतकरी बांधवांनी व बीड जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी उपस्थित राहावे .असे आवाहन प्रसिद्धी पत्रकाच्या माध्यमातून भारतीय जनता पार्टीचे ज्येष्ठ नेते तथा बीड नगर परिषदेचे माजी सभापती नवनाथ अण्णा शिरोळे पाटील यांनी केले आहे.

## तर १० तारखेनंतर केव्हाही एसटी प्रवाशांच्या प्रवासाचा खेळ खंडोबा होण्याची शक्यता ?

नागपूर दि ९ (प्रतिनिधी)- एसटी महामंडळाच्या कर्मचाऱ्यांच्या मासिक वेतनासाठी साधारण ४७५ कोटी रुपये खर्च येतो. त्यासोबतच वाढीव वेतनवाढीचा फरक देण्यासाठी दरमहा सुमारे ५८ कोटी ३० लाख रुपयांची अतिरिक्त तरतूद आवश्यक आहे. सन २०२० ते २०२४ या कालावधीतील वेतनवाढीच्या फरकासाठी राज्य सरकार दरमहा सुमारे ६५ कोटी रुपये देईल, अशी घोषणा १३ ऑक्टोबर २०२५ रोजी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या उपस्थितीत सर्व श्रमिक संघटनांच्या बैठकीत करण्यात आली होती. मात्र, गेल्या दोन महिन्यांपासून ही रक्कम राज्य सरकारकडून एसटी महामंडळाला मिळालेली नाही. येत्या १० तारखेपर्यंत वाढीव वेतनाचा फरक न दिल्यास रीतसर नोटीस देऊन तीव्र आंदोलन केली जाईल, असा इशारा श्रीरंग बरसे यांनी दिला आहे. त्यामुळे एसटी कर्मचाऱ्यांनी दहा तारखे नंतर केव्हाही संप पुकारला तर प्रवासी जनतेच्या प्रवासाचा खेळ खंडोबा होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. उपमुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीमध्ये राज्य सरकारची अब्रू वाचवण्यासाठी महामंडळाने स्वतःच्या तिजोरीतून २ महिन्यांचा वाढीव वेतनफरक कर्मचाऱ्यांना



अदा केला. या महिन्यात ३ महिन्यांची एकत्रित ११६.६९ कोटी रुपयांची रक्कम देण्यात यावी, असे पत्र महामंडळाने २० जानेवारी २०२६ रोजी राज्य सरकारकडे पाठवले होते. तरीही ही रक्कम न आल्याने व्यवस्थापनाने वाढीव वेतनाचा फरक कर्मचाऱ्यांना देऊ नये, असा निर्णय घेतला असून आज कर्मचाऱ्यांना फरकाविना वेतन देण्यात आले.एकीकडे महामंडळावर सुमारे ४ हजार २०० कोटी रुपयांची वैधानिक देणी थकीत असताना, दुसरीकडे कर्मचाऱ्यांना वाढीव वेतनाचा हप्ता न देणे ही सरळ अवहेलना असल्याचे बरगे यांनी स्पष्ट केले. येत्या १० तारखेपर्यंत वाढीव वेतनफरकाची रक्कम न मिळाल्यास रीतसर नोटीस देऊन एसटी कर्मचारी तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडतील, असा ठाम इशाराही त्यांनी दिला आहे.

दरम्यान गर्दीच्या मार्गांवर प्रवाशांना उभे राहून प्रवास करावा लागू नये, यासाठी ३ बाय २ आसन रचनेच्या तब्बल ५५ आसनी अत्याधुनिक बसेस खरेदी करण्यात आल्या आहेत. या नव्या बसेसना हिंदवी स्वराज्याची जननी असलेल्या राजमाता जिजाऊ यांचे नाव देण्यात आले असल्याची माहिती राज्याचे परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.तर या बसेस मार्च महिन्यापासून टप्प्याटप्प्याने राज्यभर प्रवाशांच्या सेवेत दाखल होणार असून, भगव्या आणि शुभ्र पांढऱ्या रंगसंगतीत सजलेल्या या बसेस महाराष्ट्राच्या परंपरेचे आणि अभिमानाचे जणू चालते-बोलते प्रतीक ठरणार असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

## खा.रजनीताई यांनी घेतली उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांची यांची सांत्वनपर भेट



केज दि ९ (प्रतिनिधी) -उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे नुकतेच विमान अपघातात दुःखद निधन झाल्याने संपूर्ण महाराष्ट्र शोकसागरात बुडाला आहे.या पार्श्वभूमीवर रविवार दि.८ फेब्रुवारी रोजी बारामती येथे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्राताई अजित दादा पवार यांची खासदार रजनीताई अशोकराव पाटील यांनी भेट घेऊन सांत्वन केले. या भेटी दरम्यान दुःख अनावर झाल्याने उपस्थितांच्या डोळ्यांत अश्रू तरळले. अजितदादा पवार यांच्या आकस्मिक निधनाने राज्याच्या राजकीय व सामाजिक जीवनात निर्माण झालेली पोकळी कधीही न भरून निघणारी असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. दुःखाच्या या प्रसंगी सुनेत्राताई पवार यांना धीर देत कुटुंबीयांप्रती सहवेदना व्यक्त करण्यात आल्या.

# संपादकीय

## जागतिक दर्जाचे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ हे भारतातीलच नाही तर जगातील एक नावाजलेले विद्यापीठ आहे. या विद्यापीठाची स्थापना १० फेब्रुवारी १९४९ रोजी झाली म्हणजे आज हे विद्यापीठाला ७७ वर्ष पूर्ण होऊन ७८ व्या वर्षात पदार्पण करीत आहे. डॉ एम आर जयकर हे या विद्यापीठाचे पहिले कुलगुरू होते. स्थापनेनंतर १२ जिल्ह्यांमध्ये उच्च शिक्षणाच्या विविध सुविधा पुरवण्याची जबाबदारी पुणे विद्यापीठावर होती. १९६४ मध्ये कोल्हापूर येथे छत्रपती शिवाजी विद्यापीठाच्या स्थापनेनंतर पुणे, नाशिक, धुळे, जळगाव या जिल्ह्यांमधील विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठाचे कार्य सुरू झाले. १९९० साली जळगाव येथे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाची स्थापना झाल्यानंतर पुणे, नगर, नाशिक या जिल्ह्यांसह दादरा नगर हवेली या केंद्रशासित प्रदेशातील महाविद्यालये या विद्यापीठाच्या मार्गदर्शनाखाली काम करीत आहेत. २०१४ साली या विद्यापीठाचा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ असा नामविस्तार करण्यात आला. पुण्यातील गणेशखिंड रस्त्यावर पुणे विद्यापीठाचे मुख्य संकुल आहे. विद्यापीठाची मुख्य इमारत पुणेकरांसाठी शैक्षणिक अस्मितेचे प्रतीक आहे. ही इमारत ब्रिटिश गव्हर्नरांच्या पुण्यातील मुक्कामासाठी एकोणिसाव्या शतकात बांधण्यात आली होती. इटालियन शैलीत बांधण्यात आलेली ही इमारत म्हणजे पुण्याला मिळालेला ऐतिहासिक वारसा आहे. विद्यपीठाचा परिसर सुमारे ४९० एकराचा असून त्यात अनेक दुर्मिळ सुंदर आणि अतिशय मनमोहक असे वातावरण लाभले आहे. घनदाट जंगल, शोभिवंत हिरवळ, दुर्मिळ ब्रिटिशकालीन कारंजे व ऐतिहासिक अशी ब्रिटिशकालीन भव्य इमारत यामुळे हा परिसर निसर्गप्रेमी चित्रपट निर्माते, दिग्दर्शक यांचे आकर्षण केंद्र राहिला आहे. पुणे विद्यापीठात दुर्मिळ तसेच सावली देणारे मोठे वृक्ष आहेत. या वृक्षांची छाया, सौंदर्य आणि उत्साह निर्माण करणारे वातावरण विद्यार्थ्यांना अभ्यास व संशोधन करण्यास प्रोत्साहित करते. विद्यापीठातून विविध पदव्युत्तर विभाग व प्रशासकीय कार्यालयाचे कामकाज चालते. या विभागातून आज जवळपास ६ लाख विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. ४२ शैक्षणिक विभाग, १२ आंतरविद्या शाखा व सेवा युनिट, २० अध्यासने, ८ राष्ट्रीय व प्रादेशिक केंद्र आहेत. ६९६ संलग्न महाविद्यालये, २८७ मान्यताप्राप्त व्यवस्थापन संस्था, १२१ मान्यताप्राप्त संशोधनकेंद्र विद्यापीठाशी संलग्न आहेत. विद्यापीठातील विविध विभागात ६० हुन अधिक देशातील विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. आपल्या विद्यार्थ्यांना परदेशी विद्यापीठातील अभ्यासक्रमाचेही फायदे व्हावेत यासाठी गेल्या काही काळात विद्यापीठाने परदेशातील नामांकित विद्यापीठांसोबत सामंजस्य करार केले आहेत. विद्यापीठाचे पहिले कुलगुरू डॉ जयकर यांच्या नावाने ओळखले जाणारे जयकर ग्रंथालय केवळ विद्यार्थ्यांनाच नाही तर विद्यापीठाबाहेरील संशोधक व अभ्यासकांनाही खेचून आणते. जयकर ग्रंथालय हे माहिती आणि संदर्भ ग्रंथासाठी भारतातीलच नव्हे तर जगातील जगातील सर्वोत्कृष्ट ग्रंथालयांपैकी एक आहे. जयकर ग्रंथालयात भारतीय व विदेशी मासिके घेतली जातात तसेच ग्रंथालयात काही नियतकालिके मोफत मिळतात. जयकर ग्रंथालयात ५ लाखांहून अधिक पुस्तके व विविध विषयांवरील मासिके आहेत. अशा सुविधांमुळेच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ राज्यातीलच नव्हे तर देशातील विद्यार्थ्यांच्या पहिल्या पसंतीचे विद्यापीठ आहे. पुणे विद्यापीठ ज्ञानाची निर्मिती, संरक्षण आणि प्रसारण करणारे जागतिक दर्जाचे विद्यापीठ आहे.

# पाली पं.स.गणातून गुजर समाजास उमेदवारी देईल त्या पक्षाच्या पाठीशी गुजर समाज राहणार-रतन गुजर

बीड दि ९(प्रतिनिधी) - पाली पंचायत समिती गणामध्ये गुजर समाजाची सामाजिक व राजकीय ताकद भक्कम असून, यापूर्वीही पंचायत समिती सदस्य गुजर समाजाचाच राहिलेला आहे. त्यामुळे येणाऱ्या निवडणुकीत जो राजकीय पक्ष गुजर समाजाला बरोबर घेईल आणि पंचायत समिती सदस्य गुजर समाजाचा असेल, त्या पक्षाच्या पाठीमागे गुजर समाज भक्कमपणे उभा राहणार असल्याचा ठाम निर्धार करण्यात आला आहे. आतापर्यंत गुजर समाजातील कार्यकर्ते सर्वच राजकीय पक्षांसोबत निष्ठेने काम करत होते. मात्र निवडणुका संपल्यानंतर समाजाकडे दुर्लक्ष केले जात असल्याने आता हे थांबवण्याचा निर्णय समाजाने घेतला आहे. आता राजकीय पक्षांची हुजरेगिरी नाही, तर समाजाची एकजूट आणि स्वतःचे नेतृत्व या भूमिकेवर समाज ठाम असल्याचे आवाहन अखिल भारतीय गुजर देवसेनेचे जिल्हाध्यक्ष रतन गुजर यांनी केले.गुजर समाज मुठभर नसून ढीगभर असून, देशभर पसरलेला आहे. समाजाचे राष्ट्रीय कार्यकारी अध्यक्ष भीमसिंह गुजर, महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष प्रशांत गुजर पाटील (नाशिक) यांच्यासह समाजातील मंत्री, आमदार व खासदार यांच्याशी चर्चा करून हा निर्णय घेण्यात आला आहे. समाजासाठी एक पाऊल पुढे टाकण्याचा संकल्प या नेत्यांनी व्यक्त केल्याची माहिती देण्यात आली.यावेळी जिल्हाध्यक्ष रतन गुजर, जिल्हा उपाध्यक्ष सुनील गुजर यांनी समाजाच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याचा निर्धार जाहीर केला. शिरूर तालुक्यातील एक, पाटोदा तालुक्यातील एक, बीड तालुक्यातील लिंबागणेश गणातील एक तसेच पाली गणातील एक अशा एकूण चार पंचायत समिती गणांमधून उमेदवार उभे करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.जर कोणत्याही राजकीय पक्षाने उमेदवारी नाकारली, तर अपक्ष उमेदवार उभा करण्याचा ठाम निर्णय समाजाने घेतला आहे. सध्या प्रत्येक गणामधून इच्छुकांची मोठी गर्दी असून, तळागाळातील सर्व समाजबांधवांची संयुक्त बैठक घेऊन सर्वानुमते एक उमेदवार निश्चित केला जाणार आहे. त्या उमेदवाराच्या पाठीमागे समाज तन-मन-धनाने उभा राहणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले.सर्व समाजबांधवांचा आशीर्वाद घेऊन हे उमेदवार निवडणूक रिंगणात उतरवले जाणार असून, आता समाज थांबणार नाही असे ठाम वचन जिल्हाध्यक्ष रतन गुजर यांनी यावेळी दिले.



# बीड जिल्ह्याचे भूमिपुत्र भरत गीते यांच्या तोरण इंडिया प्लांटचा उपक्रम

बीड दि.९(प्रतिनिधी) - बीड जिल्ह्याचे भूमिपुत्र ॲल्युमिनियम मॅन ऑफ इंडिया, उद्योजक जगताचे राजदूत भरत गित्ते यांच्या 'तौरल इंडिया' या कंपनीचा सुपा एमआयडीसी जिल्हा अहिल्यानगर येथील प्लॅन्टचा शुभारंभ राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस साहेब यांच्या हस्ते व नारायण गडाचे महंत शिवाजी महाराज, भगवान गडाचे महंत नामदेव शास्त्री महाराज व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला. अत्यंत सर्वसामान्य कुटुंबामध्ये जन्मलेले भरत गीते यांनी अत्यंत मेहनतीने ५०० कोटीचा हा भव्य दिव्य प्रकल्प उभा केला आहे.या प्रकल्पामधून रेल्वेसाठी विमानासाठी तसेच जहाजासाठी वेगवेगळे पार्ट्स बनवले जाणार आहेत. तसेच संरक्षण क्षेत्रामध्ये लागणाऱ्या रणगाड्यासाठी व इतर संरक्षण उपकरणासाठी पण विविध पार्ट तयार केले जाणार



आहेत. या आधी हे तंत्रज्ञान आपल्या भारतामध्ये उपलब्ध नव्हते.. भरत गीते यांनी जर्मनीमध्ये स्वतः कामगार म्हणून विविध कंपन्यांमध्ये अनुभव घेतला व नंतर स्वतः या कारखान्याची निर्मिती केली आहे.या आधी चाकण येथे पण एक प्रकल्प चालू आहे. सुपा येथील हा प्रकल्प ३० एकर जागेवर उभारलेला आहे. या प्रकल्पामधून १५०० ते २००० तरुणांना रोजगार उपलब्ध होणार आहे..बीड जिल्ह्यात पण लवकरच असा भव्य प्रकल्प उभा करावा हीच सदिच्छा.आणि या उपक्रमाचे हार्दिक अभिनंदन

# विद्यार्थ्यांनी आपल्या आवडीच्या क्षेत्रात करिअर करावे-डॉ.पटेल

गेवराई दि.९ (प्रतिनिधी) - विद्यार्थ्यांनी शिक्षण घेत असताना आपले ध्येय ठरवले पाहिजे. ध्येय निश्चित करून आपल्या आवडीच्या क्षेत्रात करियर करण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न आणि प्रचंड मेहनत घेतली की यशप्राप्ती नक्कीच मिळते असे प्रतिपादन अमर शिक्षण व सेवाभावी संस्थेचे सचिव डॉ.एस.एस.पटेल यांनी केले. चकलांबा येथील उच्च माध्यमिक विद्यालय, कनिष्ठ महाविद्यालयतील कला व विज्ञान शाखेतील इयत्ता बारावीच्या विद्यार्थ्यांच्या निरोप समारंभात ते अध्यक्षीय समारोप करताना बोलत होते. व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ.विजयकुमार कुलकर्णी, गणूभाऊ खेडकर त्याचबरोबर कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य पी.डी.चव्हाण सर, प्रा.समीर पटेल, प्रा.कडपे बी.बी, लेंडाळ एस.जे, प्रा.शेख जी.आर. आदीजण उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य पी.डी.चव्हाण सर यांनी केले. विद्यार्थ्यांमधून कू.टकले संध्या, बारगजे स्वाती, सय्यद अरबीया, राठोड अजित, कातखडे शुभांगी, कराड ओम या विद्यार्थ्यांनी मनोगतातून आपल्या भावना व्यक्त केल्या. डॉ.कुलकर्णी आणि गणूभाऊ खेडकर यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन शिवप्रसाद कराड व अरबीया सय्यद यांनी केले तर आभार प्रा.लेंडाळ एस.जे.यांनी मानले.

# चित्रपटातील वेशभूषाबद्दल छाया त्रिभुवन यांना पुरस्कार

छत्रपती संभाजीनगर दि ९(प्रतिनिधी) - अंबर भरारी, अखिल भारतीय चित्रपट महामंडळ आणि डॉ. श्रीकांत शिंदे फाउंडेशन आयोजित १० वा अंबरनाथ मराठी चित्रपट महोत्सव - २०२६ मध्ये अवलोकितेश्वर प्रॉडक्शन्स निर्मित 'माईसाहेब डॉ. सविता भीमराव आंबेडकर' या चित्रपटाला सर्वोत्कृष्ट वेशभूषा (Best Costume) पुरस्कार मिळाला. हा सन्मान छाया त्रिभुवन (हनी कॉस्च्युम) यांना प्रदान करण्यात आला.



डॉ. सविता भीमराव आंबेडकर यांच्या जीवनावर आधारित या चित्रपटातील अभ्यासपूर्ण व काल सुसंगत वेशभूषेला परीक्षकांकडून विशेष प्रशंसा मिळाली. या चित्रपटांमधून तो काळ निर्माण होणे, ते पात्र त्या पद्धतीने समोर पडद्यावर साकारली जाणे हे सगळं महत्त्वाचं असतं, त्या दृष्टीने हा पुरस्कार फार महत्त्वाचा आहे म्हणूनच हा पुरस्कार छाया त्रिभुवन यांना प्रदान करण्यात येत असल्याचे सांगितले.हा पुरस्कार यावेळी मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.चित्रपटाचे निर्माता- दिग्दर्शक प्रकाश त्रिभुवन आणि सहाय्यक दिग्दर्शक- अभिनेता आदित्य कुमार हे सर्व टीमसह उपस्थित होते. या पुरस्कार सोहळ्याला विजय गोखले, अरुण नलावडे, समीर चौगुले, मानसी नाईक अशोक कुलकर्णी, प्रणव रवरणे,सचिन मोटे, महेंद्र पाटील, महेश सुभेदार, अनुराधा देशपांडे , सुनील चौधरी, राहुल चौधरी, निखिल चौधरी, कुणाल चौधरी, गुणवंत खेरोदिया, अनिल गवठेकर, प्रकाश जाधव, प्रकाश नेमकर, अतुल सिधये, आमदार डॉ बालाजी किणीकर, अमेय रानडे हे मान्यवर उपस्थितीत होते.

# छत्रपती शिवाजी महाराज सार्वजनिक जयंती महोत्सव कार्यकारिणी जाहीर

गेवराई दि.९ (प्रतिनिधी) - दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी हिंदवी स्वराज्याचे संस्थापक रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांची सार्वजनिक जयंती गेवराई शहरात होत असून या संदर्भात बैठक घेऊन सार्वजनिक जयंती महोत्सवाची कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. रविवार दि.८ फेब्रुवारी रोजी शहरातील सिंधी भवन याठिकाणी सार्वजनिक शिवजयंतीची बैठक घेण्यात आली. यावेळी ॲड.संजय काळे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यकारिणी ची बिनविरोध निवडण्यात आली. यामध्ये सार्वजनिक शिवजयंतीच्या अध्यक्षपदी माजी नगरसेवक राधेश्याम काका येवले, माजी नगरसेवक राहुल जिजा खंडागळे, शामराव गायकवाड, नामदेव जवंजाळ, गणेश निकम यांची निवड करण्यात आली तर उपाध्यक्षपदी नगरसेवक शेख खाजाभाई, गौराई पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष अंकुश आतकरे, अमर नवपुते, लक्ष्मण उमाप यांची निवड करण्यात आली. तसेच सचिवपदी दीपक खंडागळे, कार्याध्यक्षपदी प्रमोद दाभाडे, मनोज धापसे, सहसचिवपदी पत्रकार जुनेद बागवान, प्रकाश पवार, राम सुतार व प्रसिद्धी विभाग प्रमुखपदी संजय सगळे पाटील, सुरेश धापसे, सय्यद अख्तरभाई यांची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली. या बैठकीला गेवराई येथील शिवप्रेमी नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते.



# पुरुषोत्तमपुरी पर्यंत पोहोचण्यासाठी चारही बाजूंनी रस्त्याची दुर्दशा-रामराव आगे

किट्टी आडगाव दि ९ (प्रतिनिधी)- तीर्थक्षेत्र विकास आराखड्यात भारतामध्ये एकमेव असलेल्या माजलगाव तालुक्यातील पुरुषोत्तमपुरी येथील भगवान परशुराम मंदिरात अधिक मासात लाखोच्या संख्येने देशभरातून पुरुषोत्तमा च्या दर्शनासाठी भाविक येत असताना या मंदिराच्या चोहोबाजूने असलेल्या खराब रस्त्याने नागरिकांना त्रास सहन करावा लागत असे या संदर्भात पाहणी झाल्यानंतर आता चोहोबाजूने चा रस्ता मजबूत करावा अशी मागणी भाविका मधून होऊ लागली आहे.

अधिक मासात लाखोच्या संख्येने पुरुषोत्तमाच्या दर्शनासाठी देशभरातून भाविक येतात हे पाहून शासनाने विविध विकास आराखड्यासाठी ५४ कोटी ५६ लाख रुपये निधी उपलब्ध करून दिलेला असून त्यानुसार मंदिर बांधकाम पूर्वपरंपरेनुसार चालू असून प्रगतीपथावर आहे परंतु इथे पोहोचण्यासाठी चारी बाजूंनी येणाऱ्या रस्त्याची दयनीय अवस्था असल्यामुळे भाविकांना हल आपेष्टाभोगत तीर्थक्षेत्र पुरुषोत्तमपुरी येथील भगवान पुरुषोत्तमाच्या दर्शनासाठी यावे लागत आहे, त्यानुसार जिल्हाधिकारी तसेच तहसीलदार यांना आणि रस्ता बांधकाम विभाग यांना वेळोवेळी



निवेदन देऊन सुद्धा रस्त्यांच्या कामांना कधीच वेग आलेला आतापर्यंत दिसला नाही . शेवटी मंदिर कमिटीने मंत्रालय गाठले आणि मुंबईवरून हालचाली सुरू झाल्या त्यानुसार सोमवार दि ९ फेब्रुवारी रोजी आयुष्यमान भारत मिशन महाराष्ट्र समिती महाराष्ट्र राज्यचे सर्वे सर्वा डॉ. ओमप्रकाश शेटे यांनी मौजे पुरुषोत्तमपुरी देवस्थान पर्यंत पोहंचण्यासाठी नियोजित रस्त्याची पाहणी करून सार्वजनिक बांधकाम विभागाचे उप अभियंता विष्णू जाधव, इंजिनीयर चंद्रकांत जेटूरे यांना प्रत्येक रस्त्याचा नकाशा दाखवून येणाऱ्या अधिक मासापर्यंत वरील रस्ता मजबूतीकरण करून घ्या .अशा सूचना देऊन कामाला लावले आणि रस्ता बांधकाम विभागाने रस्त्याची पाहणी केली, या पहाणी कार्यक्रमास आयुष्यमान भारत मिशन महाराष्ट्र समितीचे अध्यक्ष डॉ. ओमप्रकाश शेटे, रस्ता बांधकाम विभागाचे उप अभियंता विष्णू जाधव, चंद्रकांत जेटूरे, देवदूत प्रतिष्ठानचे अध्यक्ष बंडू खांडेकर, भाजपाचे माजी तालुका अध्यक्ष अशोक करे, सरपंच उत्तरेश्वर खताळ, महादेव कुंडकर, पुरुषोत्तम पुरी मंदिर कमिटीचे अध्यक्ष विजय गोळेकर, भाऊसाहेब गोळेकर, नारायण गोळेकर, अविनाश धिरडे, अशोक माने, पत्रकार पद्माकर देशमुख, पत्रकार रामराव आगे इ. उपस्थित होते. २०२६ मध्ये पुरुषोत्तम महिना (अधिकमास) १७ मे ते १४१४ जून दरम्यान अधिकमास' येत आहे त्यानुसार शासनाने त्वरित लक्ष घालून चारी बाजूंनी येणाऱ्या रस्त्यांची मजबुतीकरण करून घ्यावी अशी भाविकांची इच्छा आहे.

# प्रजासत्ताक दिनानिमित्त घेतलेल्या क्रिडास्पर्धेचे बक्षिस वितरण संपन्न



किल्ले धारूर दि ९(प्रतिनिधी) - तालुक्यातील जि. प. प्रा.शाळा गाढवदरावस्ती (सोनिमोहा)केंद्र आंबेवडगाव येथे प्रजासत्ताक दिनानिमित्त आयोजित क्रिडा स्पर्धांचे बक्षिस वितरण व विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप कार्यक्रम कृषी उत्पन्न बाजार समिती किल्ले धारुरचे सभापती मंगेश महादेव तोंडे व सोनिमोहाचे सरपंच राहुल राजेंद्र तोंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आंबेवडगाव केंद्राचे केंद्रप्रमुख दत्ता घोळवे होते.प्रमुख पाहुणे म्हणून केंद्रीय मुख्याध्यापक साखरे परमेश्वर ,जीवन ज्ञानदीप गुरुकुलचे संचालक प्रा. रामकिसन चौरे , डॉ. भारत मुंडे ,सोनिमोहाचे उपसरपंच संजय तोंडे , धनराज लांब,भारत तोंडे , बाबाराया तोंडे,अभिजित माळी व बालगायक चि.रमण धनराज लांब व इतर मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात क्रांतीज्योती सावित्रीबाई यांच्या प्रतिमापुजनाने पार पडली.बालगायक चि रमण लांब यांच्या स्वागत गीताने उपस्थित मान्यवरांचे स्वागत करण्यात आले.नंतर उपस्थित मान्यवरांचा शाल पुष्पगुच्छ देवुन यथोचित सन्मान करण्यात आला.याप्रसंगी शालेय विद्यार्थ्यांनी निवडक गाण्यांवर नृत्य सादरीकरण केले.यावेळी क्रिडा स्पर्धेत नैपुण्य दाखविणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र, रजिस्टर पेन व इतर साहित्य देवुन गौरव करण्यात आला.धारुर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती मंगेश तोंडे यांच्या सौजन्याने शालेय विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले.तसेच बक्षीसासाठी आवश्यक साहित्य सरपंच राहुल तोंडे यांनी दिले. उपसरपंच संजय तोंडे ,आदर्श शिक्षक बाबुराव तोंडे ,प्रा.रामकिसन चौरे, नेहरकर ईश्वर , सुग्रीव तोंडे व संतोष बंडु तोंडे इत्यादी मान्यवरांनी ही शालेय साहित्य वाटपासाठी मदत केली.उपस्थित मान्यवर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.सहशिक्षक विभुते शंकर यांनी प्रास्ताविकात शाळेत चालणारे विविध उपक्रम यांची माहिती उपस्थितांना दिली.याकार्यक्रमासाठी शा.व्य.समिती अध्यक्ष भक्तराज तोंडे,राजेंद्र तोंडे,अशोक तोंडे, भारत नेहरकर, सिध्देश्वर नेहरकर, रामेश्वर नेहरकर, अशोक मुंडे, नेहरू तोंडे, तुकाराम मुंडे, गोंविद तोंडे, राजाभाऊ तोंडे, शंकर तोंडे, चंद्रसेन तोंडे,बाबासाहेब तोंडे, बंडु तोंडे, उत्रेश्वर तोंडे, पांडुरंग तोंडे व सर्व माता पालक मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व प्रास्ताविक विभुते शंकर यांनी केले.कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित सर्व मान्यवरांचे आभार शाळेचे मुख्याध्यापक अर्जुन नागरगोजे यांनी मानले.

# बुलढाणा अर्बन को-ऑप क्रेडिट सोसायटी धारूरच्या वतीने विमा धनादेश खातेदाराच्या वारसास प्रदान

किल्लेधारूर दि ९( प्रतिनिधी)-शहरातील बुलढाणा अर्बन कॉप क्रेडिट सोसायटीचे कर्जदार सभासद संतोष शिवाजी मिसाळ यांचे अपघाती निधन झाले होते ,त्यांच्या सोने तारणवर त्यांच्या वारसास विमा धनादेशाची रक्कम बँकेच्या वतीने प्रदान करण्यात आली. या को-ऑपरेटिव्ह सोसायटीच्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे .

बुलढाणा अर्बन को ऑप क्रेडिट सोसायटी शाखा धारूर च्या वतीने मयत कर्जदार सभासदाचे वारस विमा धनादेश वितरण करण्यात आला . केज तालुक्यातील मु. कोल्हेवाडी पो. लव्हरी येथील रहिवासी व संस्थेचे सभासद संतोष शिवाजी मिसाळ यांनी दिनांक २० सप्टेंबर २०२४ रोजी शाखा धारूर येथून सोने तारण कर्ज रक्कम रुपये ५० हजार घेतले होते. दरम्यान त्यांचा दिनांक १५ आक्टोबर २०२५ रोजी अपघाती दुर्देवी मृत्यू झाला .संस्थेच्या वतीने ठेवीदाराला ठेवी रकमे एवढे व कर्जदारास कर्ज रकमे एवढे अपघाती विमा संरक्षण देण्यात येते. सदर घटनेची माहिती मिळतात संस्थेचे संस्थापक अध्यक्ष रामेश्वर चांडक, संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुकेश झंवर व संस्थेचे सरव्यवस्थापक कैलास कासट यांच्या आदेशानुसार तसेच बीड विभागाचे विभागीय व्यवस्थापक माधव मगर यांच्या मार्गदर्शनाखाली शाखा व्यवस्थापक



बप्पासाहेब लांडे यांनी मिसाळ परिवाराचे सांत्वन करून आवश्यक ती कागदपत्रे घेतली व या योजनेअंतर्गत जुनीच कोटक जनरल इन्शुरन्स कंपनीने मयत कर्जदार संतोष शिवाजी मिसाळ यांच्या कर्जाच्या व्याजासह पूर्ण रकमेचा ५८ हजार रुपयांचा क्लेम मंजूर करून मयत खातेदाराचे सभासद यांच्या वारसदार श्रीमती कोमल संतोष मिसाळ यांच्या सोने तारण कर्ज खात्यातील सोने चीज वस्तू विभागीय व्यवस्थापक माधव मगर यांच्या हस्ते देण्यात आले. त्यावेळी धारूर शाखेचे शाखा व्यवस्थापक बप्पासाहेब लांडे व कर्मचारी ठेविदार ग्राहक, सभासद उपस्थीत होते.

# द्वा.मंत्री राजस्थानी विद्यालयाची कु.अक्षरा क्षीरसागर वक्तृत्व स्पर्धेत द्वितीय




बीड दि.९ (प्रतिनिधी)- द्वारकादास मंत्री राजस्थानी विद्यालयाने यशाची परंपरा कु.अक्षरा क्षीरसागर हिच्या माध्यमातून पुन्हा एकदा कायम राखलेली आहे. द. बा. घुमरे पब्लिक स्कूल या विद्यालयात स्व. द.बा .घुमरे यांच्या जयंती निमित्ताने जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते त्यामध्ये विद्यालयाची विद्यार्थिनी कुमारी क्षीरसागर अक्षरा भगवान हिला द्वितीय क्रमांकाचे बक्षीस रोख रक्कम रुपये ४ हजार, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह मान्यवरांच्या शुभहस्ते प्रदान करण्यात आले. वक्तृत्व स्पर्धेचा विषय 'छत्रपती शिवाजी महाराजांची राजनीती' असा देण्यात आलेला होता. तेव्हा या विषयावर अतिशय समर्पक अशा प्रकारचे विचार अगदी प्रखरपणे कु. अक्षराने मांडुन हा विजयश्री खेचुन आणला. तिच्या या यशाबद्दल संस्थेच्या सर्व पदाधिकारी व संचालक मंडळाने तिचे अभिनंदन केले. तसेच विद्यालयाचे मुख्याध्यापक लाहोटी सर, उपमुअ हावळे सर ,पर्यवेक्षक मालपाणी सर व मार्गदर्शक शिक्षिका सौ.जोशी मॅडम, सौ.डॉ.करपे मॅडम व सर्व सहकारी शिक्षकवृंद यांनीही तिचे कौतुक केले.

# स्व.अमोल भैया गलधर यांच्या जयंतीनिमित्त रक्तदान शिबिर संपन्न

बीड, दि. ९ (प्रतिनिधी) - स्व. अमोल भैय्या गलधर यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षीप्रमाणे याही वर्षी बीड येथील शासकीय रुग्णालयात आयोजित केलेल्या रक्तदान शिबिरात स्वप्नील भय्या गलधर यांनी स्वतः रक्तदान करत अमोल भय्यांना श्रद्धांजली अर्पण केली. कार्यक्रमाच्या प्रारंभी स्व. अमोल गलधर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. अमोल भय्या हे आयुष्यभर गोरगरीब, अनाथ व गरजू लोकांच्या मदतीसाठी तत्पर असत. यावेळी बोलताना अन्नदानाबरोबरच रक्तदानही तितकेच महत्त्वाचे असून समाजातील प्रत्येकाने या कार्यात सहभागी व्हावे, असे आवाहन स्वप्निल गलधर यांनी केले. यावेळी मित्रपरिवार, डॉक्टर, वकील, व्यापारी तसेच विविध क्षेत्रातील नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत रक्तदान केले. शिबिरात उत्साही वातावरण पाहायला मिळाले.या प्रसंगी ॲड मंगेश भाऊ पोकळे,स्वप्नील भैया गलधर, सतीश शेळके,नगरसेवक मुन्ना वाघमारे,इंजि. सुहास तांबारे साहेब,केशव तावरे साहेब,दुर्गदास हुंबे,इंजि. रुपेश शिंदे,रमेश इंगोले, महेश चव्हाण,राहुल टेकाळे,बप्पा बाबर,रवीं अभिजित गलधर,ज्ञानेश पडघन, गिरीश गलधर,सागर वरपे,स्वप्निल शेळके,अक्षय जगताप,उमेश कोकाटे प्रीतम दुधाळ,



सौरभ निंबाळकर, अशोक कदम, शाम पाळणे,शुभम कुदांडे,अशोक ढोले व सर्व उपस्थित स्व अमोल भैया वरती प्रेम करणारे सर्व सहकारी व स्व. अमोल गलधर युवा मंचाचे बहुसंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.


## अशोक उच्च माध्यमिक विद्यालयात बारावी परीक्षेची तयारी पूर्ण

वडवणी दि.९ (प्रतिनिधी)- तालुक्यातीलअशोक उच्च माध्यमिक विद्यालय, चिंचाळा येथे इयत्ता बारावीच्या परीक्षेसाठी आज दि. १० फेब्रुवारी २०२६ रोजी आवश्यक त्या सर्व बैठक व्यवस्थेची तयारी पूर्ण करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांना परीक्षेदरम्यान कोणतीही अडचण येऊ नये, यासाठी केंद्र संचालक सावंत बी.आर. यांच्या नेतृत्वात शाळा प्रशासनाच्या वतीने योग्य नियोजन करण्यात आले आहे.

परीक्षा केंद्रावर १५ हॉलमध्ये रोल नंबर प्रमाणे विद्यार्थ्यांची बैठक व्यवस्था , स्वच्छता, प्रकाश व्यवस्था, आसन मांडणी तसेच शांत व शिस्तबद्ध वातावरण राखण्यावर विशेष भर देण्यात आला आहे. परीक्षा सुरळीत पार पडावी यासाठी शिक्षक व कर्मचार्यांची नेमणूक करण्यात आली असून संबंधित नियमांचे काटेकोर पालन केले जाणार आहे. शाळा प्रशासनाने विद्यार्थ्यांना वेळेवर परीक्षा केंद्रावर उपस्थित राहण्याचे तसेच आवश्यक साहित्य सोबत आणण्याचे आवाहन केले आहे. बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी ही महत्त्वाची परीक्षा असल्याने पालक व शिक्षक वर्गाकडूनही शुभेच्छा व्यक्त करण्यात येत आहेत.

# बीड जि.प.साठी भाजपची रणनीती ठरली
# पंकजाताईंची बदामराव पंडितांनी घेतली भेट

**गेवराई दि ९ (प्रतिनिधी) : बीड जिल्हा परिषदेसह गेवराई पंचायत समितीची लवकरच निवडणूक जाहीर होणार असल्याच्या पार्श्वभूमीवर भाजपा नेते माजी राज्यमंत्री बदामराव पंडित आणि भाजपा युवानेते युधाजित पंडित यांनी मुंबई येथे राज्याच्या ग्रामविकास व महिला बालकल्याण मंत्री पंकजाताई मुंडे यांची रामटेक येथे जाऊन भेट घेतली. यावेळी गेवराई तालुक्यातील जि प आणि पं स च्या निवडणुकी संदर्भात सविस्तर चर्चा झाल्याचे समजते.**



गेवराई तालुक्यात माजी राज्यमंत्री बदामराव पंडित आणि युवा नेते बाळराजे पवार यांनी भाजपा मध्ये एकत्रितपणे काम करण्याचा निर्णय घेतल्यानंतर, पहिल्याच झालेल्या गेवराई नगर परिषदच्या निवडणुकीत घवघवीत यश मिळवत भाजपने एक हाती झेंडा फडकवला आहे. आता होऊ घातलेल्या जिल्हा परिषद आणि पंचायत समितीची निवडणूक माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांच्या नेतृत्वाखाली होणार आहे. त्याबाबत रणनीती ठरवण्यासाठी आणि गेवराई मतदार संघातील विविध विकास कामांच्या नियोजनासाठी माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी दिनांक ९ फेब्रुवारी २०२६ रोजी मुंबई येथे जाऊन राज्याच्या ग्रामविकास व महिला बालकल्याण मंत्री पंकजाताई मुंडे यांची त्यांच्या रामटेक या निवासस्थानी भेट घेतली. त्यांच्या समवेत माजी अर्थ व बांधकाम सभापती युधाजित पंडित, माजी जि प सदस्य श्यामराव राठोड यांची उपस्थिती होती. नुकत्याच झालेल्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत भारतीय जनता पार्टीला घवघवीत यश मिळाल्याबद्दल ना पंकजाताई मुंडे यांचे माजी मंत्री बदामराव पंडित आणि माजी सभापती युधाजित पंडित यांनी पुष्पगुच्छ देऊन शुभेच्छा दिल्या.

## जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी पृथ्वीराजचे केले अभिनंदन

बीड दि.९ (प्रतिनिधी)- बीड तालुक्यातील राजस्थानी विद्यालय मध्ये इयत्ता दहावी मध्ये शिक्षण घेत असलेल्या पृथ्वीराज भाऊसाहेब राणे या बाल वैज्ञानिकाला यावर्षीचा अत्यंत प्रतिष्ठेचा डॉ. एपीजे अब्दुल कलाम इग्नायटेड माईंड चिल्ड्रन क्रिएटिव्हिटी अँड इनोव्हेशन नॅशनल अवॉर्ड जाहीर झाला आहे आला. हा पुरस्कार लवकरच देशाचे राष्ट्रपती यांच्या हस्ते नवी दिल्ली येथे वितरित होणार आहे. पृथ्वीराजच्या यशाचे कौतुक बीड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी डॉ. विवेक जॉन्सन यांनी केले आहे तसेच हा मान पटकावून बीड जिल्ह्याची मान उंचावली असल्याची प्रतिक्रिया जिल्हाधिकारी यांनी दिली आहे, दरवर्षी इयत्ता सहावी ते बारावीच्या विद्यार्थ्यांची राष्ट्रीय लेव्हल ला आयडिया कॉम्पिटिशन विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्रालय भारत सरकार यांच्यावतीने आयोजित करण्यात येते. पूर्ण देशभरातून प्राप्त झालेल्या लाखो आयडिया मधून केवळ दहा विद्यार्थ्यांना हा पुरस्कार देण्यात येतो.देशभरातील दहा विद्यार्थ्यांमध्ये पृथ्वीराज अव्वल ठरला आहे. ही कामगिरी करणारा पृथ्वीराज हा महाराष्ट्रातील एकमेव विद्यार्थी आहे , त्याला त्याचे वडील राज्य पुरस्कार प्राप्त विज्ञान शिक्षक भाऊसाहेब संभाजी राणे यांचे मार्गदर्शन लाभले आहे. त्याच्या या यशाबद्दल सर्व स्तरातुन अभिनंदन होत आहे.

# माजलगाव–तालखेड–नाथापूर मार्गे बीड बस सुरू करा

### आगार प्रमुखांकडे भाजपा विधानसभा विस्तारक रमेश शेंडगे यांची मागणी



माजलगाव दि.१० (प्रतिनिधी): पुंगणी ते नाथापूर या डांबरी रस्त्याचे काम नुकतेच पूर्णत्वास गेले असून या मार्गावरील नागरिकांच्या सोयीसाठी माजलगाव - तालखेड - नाथापूर मार्गे बीड बस सेवा तातडीने सुरू करावी, अशी मागणी भारतीय जनता पार्टीचे विधानसभा विस्तारक रमेश शेंडगे यांनी आगार प्रमुखांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

पुंगणी ते नाथापूर या रस्त्याच्या कामासाठी सातत्याने पाठपुरावा करून रस्ता दर्जेदार पद्धतीने पूर्ण करून घेण्यात रमेश शेंडगे यांची महत्त्वाची भूमिका राहिली होती. आता रस्ता पूर्ण झाल्यानंतर या मार्गावर बससेवा सुरू झाल्यास परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार असल्याचे त्यांनी निवेदनात नमूद केले आहे.

माजलगाव - तालखेड - नाथापूर या मार्गावर अनेक गावे येत असून सावरगाव, हा, लिमगाव, जायकवाडी, जवळा, शहापूर, खेरडा खुर्द फाटा, तालखेड, एकदरा, तेलगाव, पुंगणी डुबा, ईरला, चिंचोली, नांदलगाव, नाथापूर तसेच पिंपळनेर आदी गावांतील नागरिकांना बीड येथे शासकीय कामकाज, शैक्षणिक कारणे, तसेच वैद्यकीय उपचारांसाठी वारंवार प्रवास करावा लागतो. सध्या या मार्गावर थेट बससेवा उपलब्ध नसल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

बससेवा सुरू झाल्यास विद्यार्थी, शेतकरी, कामगार तसेच ज्येष्ठ नागरिकांना मोठा फायदा होईल, शिवाय ग्रामीण भागातील दळणवळण व्यवस्था अधिक सक्षम होईल, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे राज्य परिवहन महामंडळाने या मागणीचा गांभीर्याने विचार करून लवकरात लवकर बस सेवा सुरू करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# त्याग संघर्ष आणि समतेची प्रेरणा माता रमाई–विजय साळवे

### सम्राट अशोक नगरमध्ये माता रमाई जयंती उत्साहात साजरी



माजलगाव दि.९ (प्रतिनिधी) : येथील सम्राट अशोक नगरमध्ये माता रमाबाई भिमराव आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साहात व थाटामाटात साजरी करण्यात आली. जयंतीदिनी त्यागमुर्ति माता रमाई यांच्या प्रतिमेचे पूजन करून बुद्ध वंदनेने कार्यक्रमाची सुरुवात केली व त्यांच्या सामाजिक कार्याची व त्यागमय जिवनाची आठवण करून देत मान्यवरांनी उपस्थितांना प्रेरणादायी संदेश दिला. सामाजीक कार्यक्रमात सदैव अग्रेसर राहून काम करणारे सम्राट अशोक नगर डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती समितीचे अध्यक्ष सन्नी भाऊ प्रधान उपाध्यक्ष रोहीत साळवे सचिव अजय साळवे यांनी आयोजीत केलेल्या या अद्वितीय रमाई जयंती उत्सवास प्रमुख उपस्थितीत असलेले रिपब्लिकन सेना बीड जिल्हा अध्यक्ष विजय दादा साळवे यांनी रमाबाई भिमराव आंबेडकर यांची जिवन गाथा मांडत असतांना सांगीतले की त्याग संघर्ष आणि समतेची प्रेरणा म्हणजे माता रमाई होय. प्रसंगी माजलगाव शहर पोलिस ठाण्याचे पो. उपनिरीक्षक राठोड साहेब यांनीही उपस्थितांना संबोधित केले. कार्यक्रमा दरम्यान ४ ते १२ वयोगटातील मुला मुलींच्या विवीध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले असता उत्साही वातावरणात झालेल्या या कार्यक्रमात एकोप्याची भावना आणि सामाजीक जागृतीचे दर्शन घडले. या प्रेरणादायी कार्यक्रमाच्या निमित्ताने घेण्यात आलेला स्पर्धेमध्ये विजयी स्पर्धकांना स्वप्निल ज्वेलर्स यांच्या वतीनं बक्षिस देण्यात आले.

या कार्यक्रमाला पोलिस कर्मचारी गवळी साहेब , ज्ञानोबा भोजणे , ड नंदकिशोर खळगे, प्रशांत जाधव सर , पत्रकार रविंद्र राऊत , पत्रकार अमर साळवे , विक्की मराठे , आकाश शिंदे , अनिल भराटे यांच्या सह सम्राट अशोक नगर येथील माता भगीनी लहाण थोर मंडळी आणि यशोधरा महिला मंडळाच्या सर्व पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पि आर पी नेते सिद्धार्थ ससाणे यांनी केले तर अमोल चांदमारे यांनी आभार मानले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विशाल जाधव , संग्राम गायकवाड , अभिषेक चौरे , सिद्धु सुरवस, विराज आठवे , रितेश मिसाळ , आकाश आठवे , सुमित मोरे , ऋतिक सिरसाट आदिंनी परिश्रम घेतले.

# बहुजन विकास मोर्चा अध्यक्ष बाबुराव पोटभरे यांची आ.सुरेश धस यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट



**पाटोदा । महेश बेदरे**

बहुजन विकास मोर्चाचे अध्यक्ष श्री. बाबुरावजी पोटभरे यांनी रविवार, दिनांक ८ फेब्रुवारी रोजी आमदार सुरेश धस यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली. या भेटीदरम्यान आमदार सुरेश धस यांनी बाबुराव पोटभरे यांचा पारंपरिक फेटा बांधून सत्कार केला.

या वेळी परिसरातील सामाजिक प्रश्न, सर्वसामान्यांच्या अडचणी, तसेच विविध विकासात्मक विषयांवर सविस्तर चर्चा झाली. पाटोदा तालुका व परिसराच्या सर्वांगीण विकासासाठी समन्वयाने काम करण्याबाबत सकारात्मक संवाद झाला.या भेटीच्या प्रसंगी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (रिपाई) पाटोदा तालुकाध्यक्ष डॉ. नरेंद्र जावळे, माजलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती श्री. श्रीहरी मोरे, ज्येष्ठ नेते श्री. नवनाथ धायजे तसेच श्री. शेख बाबा उपस्थित होते. विकासात्मक सहकार्य आणि राजकीय समन्वय अधिक दृढ होईल, असा विश्वास यावेळी उपस्थितांनी व्यक्त केला.

# चंपावती महोत्सव महाकरंडक २०२६ मध्ये आदर्श विद्यालयातील विद्यार्थ्यांचा सहभाग

बीड दि ९(प्रतिनिधी)- चंपावती महोत्सव उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे महा करंडक स्पर्धेमध्ये आदर्श विद्यालयातील शिशु गट व इयत्ता ४ ते ६ वी गटातील समूह नृत्य सादरीकरण अतिशय सुंदर प्रकारे केले.शिव तांडव मधील विद्यार्थ्यांचे सादरीकरणाचे नेत्रसुख घेऊन प्रेक्षकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद व दाद दिली.तसेच शिशु गटातील धुरंधर गाण्यातील चिमुकल्यांचे सादरीकरण खूपच मनमोहक होते गाण्याचे सादरीकरण सुरू होताच टाळ्यांच्या कडकडाटाने नाट्यगृह दुमदुमून गेले.

या छोट्या बालकलाकारांचा उत्साह वाढवण्यासाठी व प्रोत्साहन देण्यासाठी मोठ्या संख्येने पालक व प्रेक्षक उपस्थित होते.तसेच ४ थी ते ६ वी गटात देशभक्तीपर गीत जलवा जलवा सादरीकरण झाले.रेट्रो गीत, गोंधळ गीत व बाबा थिम ही गाणी लक्षवेधी ठरली.इयत्ता ६ वी च्या विद्यार्थ्यांचे शिव तांडव .श्री.छत्रपती संभाजी महाराजांना मनाचा मुजरा करून ६ वी च्या विद्यार्थ्यांनी छावा थिम चे सादरीकरण समूह नृत्य संपल्यानंतर ४ थी ते ६ वी गटामध्ये कु.अनघा शेंडगे व कु आरोही रोहिटे,७वी ते १० वी कु.राजनंदिनी गाडे व कु.आरोही लांडे यांचे तसेच, कु.भक्ती गोगुळे व कु.साधना यादव , कु.श्रुष्टी तेलप व कु.राधिका वाघमारे , कु .अनुष्का सुळे व कु .जान्हवी डरफे , कु.प्रियांशी वाघमारे व अनवी शिनगारे यांचे अप्रतिम नृत्य सादरीकरण.५ फेब्रुवारी ला एकपात्री अभिनय स्पर्धेत.इयत्ता १ ली १० वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांचा सहभाग कु.संध्या साळुंके - राणी ताराराणी कु.अक्षरा मोरे- बलात्कारी मुलीची व्यथा ,कु.मोहिनी फसले - मोबाईल ची व्यथा, कु.प्रियांशी वाघमारे -बाप, कु.नव्या पवार-मी सावित्री,कु.राधिका सावंत-मी जिजाऊ,तेजस्विनी हटवटे-महाकाली,अशा प्रकारचे अनेक विषय घेऊन सादरीकरण करण्यात आले. याशिवाय इतर कार्यक्रमात देखील इयत्ता १ ली ते १० वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. चंपावती महोत्सव आयोजन करण्या-या सर्व मान्यवरांचे खुप खुप धन्यवाद.

# अंधश्रद्धा व बालविवाहाला आळा घालावा–हभप अच्युत महाराज

अंबाजोगाई दि ९ (प्रतिनिधी)- मानवलोक समाजकार्य महाविद्यालय अंबाजोगाई येथील अजीवन शिक्षण व विस्तार सेवा केंद्राच्या वतीने अंबाजोगाई तालुक्यातील मौजे अंजनपूर येथे दिनांक ८ फेब्रुवारी २०२६ रोजी अंधश्रद्धा व बालविवाह विरोधी जनजागृती पर किर्तन सेवा पार पडली. या कीर्तन सेवेत ह भ प अच्युत महाराज कुलकर्णी यांनी समाजातील अंधश्रद्धा निर्मूलन व बालविवाहास प्रतिबंध घालण्यासाठी गावोगावी जाऊन जनजागृती करणे गरजेचे आहे. आज वाढत्या अंधश्रद्धेमुळे समाजाची वैचारिक प्रगती खुंटते तसेच बालविवाहामुळे मुलींच्या शिक्षणावर, आरोग्यावर आणि सर्वांगीण विकासावर गंभीर परिणाम होतो. कीर्तनातून संतवाणी, उदाहरणे व समाजप्रबोधनपर संदेश देत त्यांनी पालकांनी मुला-मुलींच्या शिक्षणाला प्राधान्य द्यावे, कायद्याची माहिती करून घ्यावी आणि बालविवाहास स्पष्ट नकार द्यावा, असे आवाहन अच्युत महाराज कुलकर्णी यांनी उपस्थित गावकऱ्यांना केले. उपस्थित श्रोत्यांनी कीर्तनाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

या कीर्तन सेवेमुळे समाजात अंधश्रद्धा व बालविवाहाविषयी जनजागृती होऊन सकारात्मक बदल घडेल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला. कार्यक्रमास महाविद्यालयातील डॉ.हनुमंत साळुंके व विद्यार्थी तसेच ग्रामस्थ, महिला, युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.


## जाहिर प्रगटन

सर्व जनतेस या जाहिर प्रगटनाव्दारे कळविण्यात येते की, शिवार मौजा टालेवाडी, ता. माजलगाव जि.बीड हद्दीतील जमीन नामे डोबी, जमीन गट नं. ४९/१२३४, एकूण क्षेत्रफळ ०३ है.८२ आर पो.ख.०४ आर आकार १४ रु.४४ पैसे पैकी वादग्रस्त मिळकत ०० हे.६० आर आकार ०२ रु.२६ पैसे सदर मिळकतीची चतुःसिमा **पुर्वेस** : सरकारी रस्ता, **पश्चिमेस :** कमलाकर शेषनारायण टाले, **दक्षिणेस :** प्रविण मधुकर रुद्रवार, **उत्तरेस :** अभिमान यादवराव जगताप. या चतुः सिमेच्या आतील मिळकतीवर प्रतिवादी नं.१ प्रविण मधुकर रुद्रवार याने दक्षिण बाजुने ५० आर तसेच प्रतिवादी नं.२ अभिमान पि. यादवराव जगताप यांनी उत्तर बाजुने १० आर बेकायदेशीररित्या अतिक्रमण केलेले आहे. त्याबाबत आमचे पक्षकार नामे शांताबाई भ्र. नागाबुवा गिरी यांनी प्रतिवादी नं. १ प्रविण मधुकर रुद्रवार, प्रतिवादी नं.२ अभिमान पि.यादवराव जगताप, प्रतिवादी नं.३ कमलाकर पि. शेषनारायण टाले यांचेविरुध्द मा. दिवाणी न्यायाधिश साहेब (क. स्तर) माजलगाव यांचे न्यायालयात रे.दि.दा.नं.१७७/२०१९ शांताबाई विरुध्द प्रविण वगैरे अतिक्रमण हटवून ताबा मिळणे बाबत दाखल केलेला असून तो न्यायप्रविष्ठ आहे.

असे असतांना उपरोक्त व्यक्तींनी आमचे अशीलाचे मिळकतीवर अतिक्रमण करून सदर क्षेत्रावर बेकायदेशीररित्या प्लॉट पाहून सदर प्लॉट विविध लोकांना विक्री/हस्तांतरीत करण्याच्या प्रयत्नात आहेत. वास्तविक पाहता सदर मिळकतीशी उपरोक्त व्यक्तींचा कसल्याही प्रकारचा हक्कसंबंध नव्हता व नाही.

सर्व जनतेस नम्रपुर्वक कळविण्यात येते की, त्यामुळे उपरोक्त वर्णनाच्या मिळकतीविषयी कोणत्याही व्यक्ती अथवा संस्थेने प्रतिवादी नं. १ प्रविण मधुकर रुद्रवार, प्रतिवादी नं.२ अभिमान पि. यादवराव जगताप, प्रतिवादी नं.३ कमलाकर पि. शेषनारायण टाले यांचे बरोबर खरेदी, विक्री, इसारपावती, बक्षिसपत्र, दानपत्र व इतर कोणत्याही प्रकारचा करार अथवा व्यवहार करू नये नसता संभाव्य होणाऱ्या खर्च व संपूर्ण परिणामांची संपूर्ण जबाबदारी करार/खरेदी करणाऱ्या व्यक्तीवर राहिल तसेच त्यास पोलीस, दिवाणी व फौजदारी कार्यवाहीस सामोरे जावे लागेल. त्याच्या खर्च व परिणामांची जबाबदारी संबंधीतावर राहिल.

दिनांक : ०८/०२/२०२६

जाहीर प्रगटन देणार
**शांताबाई भ्र. नागाबुवा गिरी**
रा. तांबवा ता. केज जि.बीड

**मार्फत : ॲड.ए.डी.जगताप**
(जिल्हा व सत्र न्यायालय माजलगाव)
ऑफीस : स्वामी विवेकानंद नगर, माजलगाव जि. बीड
मो.नं. ९८६००७६१२१



दै.पार्श्वभूमी,बीड Date-10/02/2026

**CHANGE IN NAME**

I DECLARED BY THIS PUBLICATION ABOUT CHANGE IN MY NAME OF

**OLD NAME - MOHIB SHAUKAT SHAIKH**

**New Name : SHAIKH MOHIB SHAIKH SHAUKAT**

Address-S/o.Shaikh Shaukat, New Monda, Siddiqui Colony, Majalgaon Manjlegaon Dist.Beed. Maharashtra 431131



दै.पार्श्वभूमी,बीड Date-10/2/2026

**CHANGE IN NAME**

I DECLARED BY THIS PUBLICATION ABOUT CHANGE IN MY NAME OF

**OLD NAME - GAZI CHAUSE**

**New Name : CHAUSE GAZI CHAUSE SAHAL**

Address- Near Raj Masjid Raj Galli Manjlegaon Dist. Beed MH.431131


# पाटोदा बेलखंडी शिवारात साठवण तलावाला प्राधान्य देऊ – राजेंद्र मस्के



बीड दि ९ (प्रतिनिधी)– पाटोदा बेलखंडी परिसरातील शेतकऱ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आणि कृषी सिंचन क्षमतेत वाढ घडवून आणण्यासाठी साठवण तलाव उभारणीला प्राधान्य दिले जाणार असल्याची माहिती राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी दिली.

मस्के यांनी सांगितले की, या परिसरातील शेती उत्पादनक्षमता वाढवण्यासाठी पाण्याचा शाश्वत स्त्रोत निर्माण करणे अत्यावश्यक आहे. त्यामुळे आगामी काळात कचारवाडी शिवारात साठवण तलाव मंजूर करून घेण्यासाठी प्रशासनाशी सातत्याने पाठपुरावा केला जाईल. नगदी पिकांच्या शेतीतून शेतकऱ्यांचे उत्पन्न व जीवनमान उंचावण्यासाठी जलसिंचन सुविधा मजबूत करणे आवश्यक सल्याचेही त्यांनी सांगितले. आज लिंबागणेश जिल्हा परिषद गटातील पाटोदा (बेलखंडी) शिवारातील दत्तनगर येथील उंच टेकडीवरील श्रीदत्त मंदिराकडे जाणाऱ्या सिमेंट कॉंक्रीट पायऱ्यांचे बांधकाम पूर्ण झाले असून, या कामाचा लोकार्पणकार्यक्रम प्रसंगी उपस्थित लोकांसी संवाद साधला महंत श्रीधर दादा जामोदेकर व राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्या हस्ते भक्तिमय वातावरणात पार पडला. यावेळी भक्तीदास महाराज, माजी सरपंच अमोल बडगे, मंजूर फेडरेशनचे संचालक बद्रीनाथ जटाळ,यांच्या सह कार्यक्रमास ग्रामस्थ, पंचक्रोशीतील भक्तगण मोठ्या संख्येने उपस्थित होते.


## जाहीर प्रगटन

**मा.सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर पाटोदा, ता. पाटोदा जि. बीड यांचे न्यायालयात**

किरकोळ दि.अर्ज ६६/२०२६ संदिप व ईतर विरुध्द निरंक मार्फत : श्री.एस.बी.थोरवे

ज्यापेक्षा **शुभांगी भ्र.विठ्ठलराव राजहंस,** हे दिनांक २९/१०/२०१६ रोजी मयत झाले असुन खालील अर्जदार हे त्यांचे वारस आहेत.

१) संदिप पि.विठ्ठलराव राजहंस वय ४२ वर्षे, धंदा शेती, २) सचिन पि. विठ्ठलराव राजहंस वय ३९ वर्षे धंदा शेती, ३)संगिता भ्र.मिलिंद लांडगे वय ४५ वर्षे, धंदा घरकाम

**अर्जदार क्र.१** यांचा पत्ता रा.पाटोदा, ता.पाटोदा जि. बीड ह.मु. एस.वाई. परंकर, ५, आरएस–१७. नागापुर/एमआयईडीसी नगर अहमदनगर.

**अर्जदार क्र.२** यांचा पत्ता रा. पाटोदा, ता. पाटोदा जि. बीड ह. मु.शीव सरोवर को. ऑप सोसायटी नियर गोल्डन पॉईंट, ५०० क्वॉर्टर रोड, प्लॉट नं.एच ३१७४/७ हाउस नं. १५, जीआईडीसी अंकलेश्वर, ले.जी.आई.डी.सी. अंकलेश्वर इए. भरुच, गुजरात

**अर्जदार क्र.३** यांचा पत्ता रा.पाचंग्री, ता.पाटोदा जि. बीड

ज्याअर्थी, अर्जदार क्र.१ व २ हे मयताचे मुले असुन अर्जदार क्र.३ ही मयताची विवाहित मुलगी आहे. या व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही वारस नाहीत, असे वरील अर्जदारांचे म्हणणे आहे. वरील अर्जदार यांनी ते मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट, सदरहू अर्जदारांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना/अर्जदारांना सदरहू मयत **शुभांगी भ्र. विठ्ठलराव राजहंस,** यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक, ०४/०२/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

**पु.ता.३०/०३/२०२६**

आदेशावरुन
सहाय्यक अधिक्षक दिवाणी न्यायालय
क.स्तर, पाटोदा ता.पाटोदा जि.बीड.

क.लिपीक



## जाहीर प्रगटन

**मा.सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर पाटोदा, ता.पाटोदा जि.बीड यांचे न्यायालयात**

किरकोळ दि.अर्ज ६२/२०२६ सिताराम विरुध्द अनुसया व ईतर मार्फत : श्री.आर.जी.औटे

ज्यापेक्षा **महादेव पि. बाबासाहेब येडे,** हे दिनांक २३/०५/२००८ रोजी मयत झाले असुन खालील अर्जदार हे त्यांचे वारस आहेत.

**अर्जदार :** सिताराम पि. महादेव येडे, वय ४९ वर्षे, धंदा शेती

**गैरअर्जदार :** १) अनुसया भ्र. महादेव येडे,वय ८० वर्षे, धंदा घरकाम,
२) राजेंद्र पि. महादेव येडे वय ५८ वर्षे, धंदा घरकाम

अर्जदार व गैरअर्जदार क्र १ व २ यांचा पत्ता रा. वैजाळा, ता. पाटोदा जि. बीड

ज्याअर्थी, अर्जदार व गैरअर्जदार क्र २ हे मयताचे मुले असुन गैरअर्जदार क्र १ ही मयताची पत्नी आहे. या व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही वारस नाहीत, असे वरील अर्जदारांचे म्हणणे आहे. वरील अर्जदार यांनी ते मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट, सदरहू अर्जदारांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना / अर्जदारांना सदरहू मयत **महादेव पि. बाबासाहेब येडे,** यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक. ०४/०२/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

**पु.ता.२७/०३/२०२६.**

आदेशावरुन
सहाय्यक अधिक्षक दिवाणी न्यायालय
क.स्तर, पाटोदा ता.पाटोदा जि.बीड.

क.लिपीक

# पार्श्वभूमी

दि.१० फेब्रुवारी २०२६ मंगळवार



## अतुलसेठ कांकरिया यांना मातृशोक



पाटोदा दि ९ (प्रतिनिधी) - पाटोदा येथील प्रतिष्ठित व्यापारी अरुण सुवालाल कांकरिया यांच्या पत्नी लिलाबाई अरुण कांकरिया यांचे सोमवारी दुःखद निधन झाले. मृत्यू समयी त्यांचे वय ७५ वर्षाचे होते. कृषी दुकानदार तसेच साई गॅस एजन्सी चे मालक राहुल व अतुल यांच्या त्या मातोश्री होत्या. अंत्यविधी मंगळवार दि १०रोजी सकाळी ९ वाजता पाटोदा येथील स्मशानभूमीत होणार आहे. लिलाबाई ह्या मनमिळावू स्वभावाच्या होत्या त्यांच्या अकाली निधनाने सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे

## विनायक लाड यांचे निधन



गेवराई दि.९ (प्रतिनिधी) :- गेवराई शहरातील विनायक यलीगार (लाड) यांचे राहत्या घरी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले असून त्यांच्या पार्थिवावर शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. रविवार दि.८ फेब्रुवारी रोजी सकाळीं विनायक यलीगार यांना हृदयविकाराचा तीव्र झटका आल्याने यांचा जागीच मृत्यू झाला. विनायक

पान २ वर

### ३५ किमी सुरक्षित वायरअभावी नागरिक व महावितरण कर्मचाऱ्यांच्या जीविताला धोका

# पाटोद्यात ४० पैकी फक्त सातच वीज खांबांवर एअर बंच केबल

**पाटोदा दि.९(प्रतिनिधी):– शहरातील वीजपुरवठ्याची गंभीर स्थिती पुन्हा एकदा समोर आली असून, शहरात कार्यरत असलेल्या ४० वीज वितरण खांबांपैकी (डीपी) केवळ सात ठिकाणीच एअर बंच केबल बसवण्यात आली आहे. उर्वरित ३३ डीपींवर अद्यापही जुनी, उघडी व धोकादायक वायर असल्याने नागरिकांची सुरक्षितता, महावितरण कर्मचाऱ्यांचा जीव आणि शहराचा निर्विघ्न वीजपुरवठा तिन्ही बाबी धोक्यात आल्या आहेत.**

बीड जिल्ह्यासाठी सुरक्षित वीजपुरवठ्याच्या उद्देशाने एअर बंच केबल उपलब्ध झाली असली, तरी पाटोदा तालुका व शहरासाठी अत्यल्प प्रमाणातच केबल मिळाल्याने केवळ सहा ते सात डीपींवरच हे काम पूर्ण होऊ शकले आहे. परिणामी शहरातील बहुसंख्य भाग अजूनही धोकादायक उघड्या तारांवर अवलंबून आहे.शहरातील ४० डीपीपैकी एखाद्या एका डीपीवर दुरुस्तीचे काम सुरू असले, तरी त्याचा परिणाम अनेक भागांतील वीजपुरवठ्यावर होतो. यामुळे शासकीय कार्यालये, न्यायालय, पोलीस यंत्रणा तसेच सामान्य नागरिकांना वारंवार वीजखंडिततेचा सामना करावा लागत आहे. गेल्या काही काळात वीजपुरवठ्यातील अनियमितता सातत्याने वाढल्याने महावितरणच्या कार्यपद्धतीबाबत नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. शेष म्हणजे पावसाळ्यात तारा एकमेकांना घासून ठिणग्या उडणे, झाडांच्या फांद्यांमुळे तारा

पान २ वर

**महावितरणनेच दिलेल्या माहितीनुसार पाटोदा शहरात आतापर्यंत फक्त ३० टक्के एअर बंच केबलचे काम पूर्ण झाले असून, उर्वरित ७० टक्के काम एअर बंच केबल उपलब्ध नसल्यामुळे प्रलंबित आहे. वाढती लोकसंख्या, दाट वस्ती आणि अरुंद रस्त्यांचा विचार करता पाटोदा शहरासाठी किमान ३५ किलोमीटर एअर बंच केबलची तातडीची गरज आहे.**



## माजलगावच्या सिध्देश्वर मंदिरात साप्ताहिक रूद्रचैतन्य जागर

### महाशिवरात्री उत्सवात विवीध धार्मिक कार्यक्रम





माजलगांव दि.९(प्रतिनिधी):- शहराचे ग्रामदैवत असलेल्या सिध्देश्वर महादेव मंदिरात महाशिवरात्री उत्सवाचे आयोजन सुकाणू समितीच्या वतीने करण्यात आले असुन विविध धार्मिक कार्यक्रमांने महादेवाचा जागर होणार असुन दि. १० ते दि. १६ फेब्रुवारी दरम्यान साप्ताहिक रूद्रचैतन्य जागरात भजन संध्या, सामुहिक शिवलिलामृत, रूद्र याग यासह विवीध धार्मिक कार्यक्रम होणार आहेत. यात दि. १० मंगळवारी संध्याकाळी आर्ट ऑफ लिव्हींगचे शरद डोल्हारकर यांची सत्संग भजन संध्या, दि. ११ ते १३ फेब्रुवारी दरम्यान सामुहिक शिवलिलामृत पारायण सकाळी ६ ते ८, दि. १४ फेब्रुवारी शनिवारी रूद्रयाग सकाळी, रात्री प्रदोष पुजा व महाआरती, दि. १५ रविवारी तीनवेळा श्रृंगार व महाआरती तर रात्री बारा वाजता भस्म

पान २ वर

# आरोग्य विभागाचा राजेशाही कारभार बंद करा ; अन्यथा आंदोलन - थावरे

### अपंग प्रमाणपत्र शिबीर अचानक रद्द झाल्याने

माजलगाव दि.९ (प्रतिनिधी): ग्रामीण रुग्णालय माजलगाव येथे प्रत्येक महिन्याच्या प्रत्येक सोमवारी आयोजित करण्यात येणारे अपंग प्रमाणपत्र (युडी-आयडी) शिबिर कोणतीही पूर्वसूचना न देता अचानक स्थगित करण्यात आल्याने शेकडो रुग्णांची मोठ्या प्रमाणावर हेळसांड झाली. या प्रकाराचा तीव्र निषेध करत शेतकरी नेते भाई गंगाभिषण थावरे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना जाब विचारण्याची मागणी केली आहे.

या शिबिरासाठी तालुक्यासह परिसरातील अपंग रुग्ण व त्यांचे नातेवाईक शेतीची कामे, रोजगार बुडवून तसेच स्वतःचा खर्च करून ग्रामीण रुग्णालयात हजर झाले होते. मात्र रुग्णालयात आल्यानंतर शिबिर अचानक रद्द झाल्याची माहिती देण्यात आली. त्यामुळे रुग्ण निराश होऊन परत फिरताना दिसून आले. वंसामान्य, गोरगरीब अपंग रुग्ण आधीच अडचणीत आहेत. प्रशासनाच्या आवाहनाला प्रतिसाद देत ते वेळ व पैसा खर्च करून येतात, आणि नंतर अचानक शिबिर रद्द करून त्यांची हेळसांड केली जाते. ही राजेशाही आणि हुकूमशाही पद्धत अजिबात खपवून घेतली जाणार नाही असा इशारा भाई थावरे यांनी दिला आहे.या प्रकरणात जबाबदार अधिकाऱ्यांवर तात्काळ कारवाई करून कायदेशीर पावले उचलावीत, अशी मागणी त्यांनी केली. तसेच भविष्यात अशा प्रकारची



मनमानी पुन्हा झाली तर ग्रामीण रुग्णालयात घेराव घालून तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही शेतकरी नेते भाई गंगाभिषण थावरे यांनी दिला आहे.

## म.गा.ग्रा.रो.यो.अंतर्गत नवीन कामांना मान्यता बंद

### आमिषाला बळी न पडण्याचे गटविकास अधिकारी गोकुळ बागलाने यांचे आवाहन

आष्टी (प्रतिनिधी) :- आष्टी तालुक्यात महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजना (म.गा.ग्रा.रो.यो.) अंतर्गत सध्या कोणत्याही नवीन कामांना प्रशासकीय मान्यता देणे बंद करण्यात आले आहे. यामध्ये जलसिंचन विहीर, शेततळे, शेळीपालन शेड, वृक्ष लागवड, फळबाग लागवड आदी सर्व कामांचा समावेश आहे. द्र शासनाकडून सदर कामांचे सांकेतांक (वर्क कोड) काढण्याची प्रक्रिया सध्या थांबविण्यात आल्यामुळे नवीन कामांना मंजुरी देता येणार नसल्याची माहिती पंचायत समिती आष्टीचे गट विकास अधिकारी गोकुळ बागलाने यांनी दिली आहे. पार्श्वभूमीवर तालुक्यातील लाभार्थी व नागरिकांनी कोणत्याही आर्थिक प्रलोभनाला बळी पडू नये तसेच दलालांच्या आमिषाला आहारी जाऊ नये, असे स्पष्ट आवाहन गट विकास अधिकारी बागलाने यांनी केले आहे. याबाबत कोणीही पंचायत समिती आष्टी येथे कोणतेही प्रस्ताव दाखल करू नयेत, असेही त्यांनी आवाहन लाभार्थी व नागरिक यांना केले आहे.

## आ.नमितातार्ई यांनी मागणी करताच हज यात्रेकरूची वैद्यकीय तपासणी अंबाजोगाईतच होणार

अंबाजोगाई दि ९ (प्रतिनिधी) - पवित्र हज यात्रेसाठी जाणाऱ्या भाविकांच्या वैद्यकीय तपासणीचा प्रश्न अखेर निकाली निघाला असून आ. नमिता मुंदडा यांच्या पाठपुराव्यामुळे आता ही तपासणी अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातच होणार आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून सुरू असलेली ही सुविधा तांत्रिक कारणास्तव बंद झाल्या भाविकांचे होणारे हाल लक्षात घेऊन आमदार मुंदडा यांनी थेट राज्याच्या आरोग्यमंत्र्यांकड धाव घेतली होती. त्यांच्या या प्रयत्नांना यश आले असून मंगळवारपासून ही प्रक्रिया पुन्हा पूर्ववत सुरू होत आहे.हज यात्रेला जाण्यापूर्वी प्रत्येक भाविकाला वैद्यकीय तपासणी करणे अनिवार्य असते. अंबाजोगाई येथील स्वाराती रुग्णालयात मागील ३० ते ३५ वर्षांपासून ही सोय उपलब्ध होती. मात्र यावर्षी आरोग्य विभागाने ऑनलाइन नोंदणीसाठी नवीन ॲप सुरू केले आणि त्याचा 'पासवर्ड' केवळ बीडच्या जिल्हा शल्य चिकित्सकांकडेच उपलब्ध करून दिला.



पान २ वर

### घोगस पारगावमध्ये गाळमुक्त योजनेअंतर्गत

## ११ लाख ८४ हजार रुपयांचा भ्रष्टाचार

**चौकशी समितीने अहवाल देऊनही कार्यवाही नाही, प्रशासन गप्प का ?**

***महिला सरपंचाची दिशाभूल करून उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामसेवक, ग्राम रोजगार सेवकांनी उचलले पैसे : गर्कळ***

बीड( प्रतिनिधी):- शिरूर कासार तालुक्यातील घोगस पारगाव या ठिकाणी गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार योजनेअंतर्गत २०२५ मध्ये तब्बल ११ लाख ८४ हजार रुपयांचा भ्रष्टाचार झाला असून उपसरपंच, ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामरोजगार सेवक, ग्रामपंचायत सदस्य यांनी मिळून महिला सरपंच अमृता धनंजय गर्कळ यांना अंधारामध्ये ठेवून दिशाभूल करून गाव शिवारातील पाझर तलाव क्रमांक १, क्रमांक २,क्रमांक ३ मधील गाळ काढल्याचे दाखवून तब्बल अकरा लाख ८४ हजार ३६० रुपये उचलुन भ्रष्टाचार करून प्रशासनाला एक प्रकारचा चुनाच लावला आहे. याची महिला सरपंच अम्रता गर्कळ माहिती मिळताच लगेच त्यांनी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना निवेदनाद्वारे माहिती देऊन संबंधितांवर कार्यवाही करावी

पान २ वर




धनराज विशाल ढाकणे याने नारायणा इटेक्नो स्कूलमध्ये पार पडलेल्या सायकल स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक व बॉल कलेक्टींग स्पर्धेमध्ये द्वितीय क्रमांक पटकावला त्याबद्दल त्याचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# मच्छिंद्रनाथ संजीवन समाधी सोहळ्याच्या तयारीचा आढावा

### आ.धस यांच्या अध्यक्षतेखाली पूर्वनियोजन बैठक

आष्टी (प्रतिनिधी) :-सावरगाव मायंबा येथील श्री क्षेत्र मच्छिंद्रनाथ गडावर दरवर्षीप्रमाणे यंदाही मच्छिंद्रनाथ संजीवन समाधी सोहळा १८ मार्च रोजी मोठ्या भक्तिभावात साजरा होणार आहे. गुढीपाडव्याच्या पूर्वसंध्येला वर्षातून एकदाच ही संजीवन समाधी भाविकांच्या दर्शनासाठी खुली केली जाते. या पवित्र सोहळ्यासाठी देशाच्या कानाकोपऱ्यातून लाखो नाथभक्त उपस्थित राहत असतात. या पार्श्वभूमीवर उत्सवाच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी सोमवारी देवस्थानचे विश्वस्त तथा आ.सुरेश धस यांच्या अध्यक्षतेखाली पूर्वनियोजन बैठक पार पडली. या



बैठकीस पोलीस,

पान २ वर

## जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेच्या प्रवेशद्वार कमानीचा अनावरण सोहळा संपन्न



आष्टी दि.९(प्रतिनिधी):- जामगाव येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेच्या नव्याने सुशोभित करण्यात आलेल्या प्रवेशद्वार कमानीचा अनावरण सोहळा सरपंच राधेश्याम धस व जामगाव ग्रामस्थांच्या हस्ते उत्साहात संपन्न झाला.जामगावचे कर्तव्यदक्ष युवा सरपंच मा. राधेश्याम (भैय्या) धस यांच्या विशेष सहकार्याने शाळेच्या प्रवेशद्वार कमानीचे सुबक व आकर्षक सुशोभीकरणाचे काम पूर्ण करण्यात आले असून त्यामुळे शाळेच्या सौंदर्यात भर पडली आहे.शाळेतील सोयीसुविधांवर विशेष लक्ष देत आवश्यक फर्निचर, इन्व्हर्टर बॅटऱ्या, शाळा

पान २ वर

## माजलगावात मंगलनाथ मंदिरात शिवमहापुराण कथाचे आयोजन



माजलगाव दि.९ प्रतिनिधी: शहरातील मंगलनाथ मंदिरात महाशिवरात्री निमीत्त मंगलनाथ यात्रा महोत्सवात शिवमहापुराण कथेचे आयोजन करण्यात आले असुन भाविकांनी कथा श्रावणाचा लाभ घ्यावा असे आवाहन पुजारी ज्ञानेश्वर जाधव, कथेचे व महाप्रसादाचे यजमान बालासाहेब बाबुराव गिरी यांचे वतीने करण्यात आले आहे.

शहरातील बाह्यवळण रस्त्यावर असलेल्या पुरातन मंगलनाथ मंदिरात प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी

पान २ वर

## धाकट्या अलंकापुरीत ४८ वा महाशिवरात्र सोहळा उत्साहात प्रारंभ

### स्वामी विवेकांद गिरीजी व विवेक शास्त्री यांचे हस्ते विणा पुजन

शिरूर कासार दि.९(प्रतिक भांडेकर):- हजारो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या धाकट्या अलंकापुरीत सोमवारी वै.आबादेव महाराज यांनी प्रारंभ केलेला ४८ वा महाशिवरात्र सोहळा मोठ्या उत्साहात प्रारंभ झाला.स्वामी विवेकानंद गिरीजी आनंद आश्रम कांदिवली व संस्थानचे उत्तराधिकारी विवेक महाराज शास्त्री यांचे हस्ते कलश स्थापन व विणा पुजन करून अतुल शास्त्री,चंद्रकांत महाराज वारंगुळे याचे सह उपस्थित भाविकांनी पुष्प वृष्टी करून हर हर महादेवच्या गजरात व ब्रम्हवृदांच्या मंत्रघोषात शेकडो भाविकांच्या उपस्थितीत हा सोहळा सुरू झाला. वै.आबादेव



महाराज यांनी प्रारंभ केलेला हा सोहळा आता सुवर्ण महोत्सवाकडे वाटचाल करत असुन सोमवारी ४८ वा महाशिवरात्र सोहळा सुरू झाला सकाळी विष्णू सहस्त्रनाम व नंतर सामुहिक ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सुरू झाले त्यानंतर दुपारी दिनेश गाडेकर यांचे कन्नदान ,दुपारी गाथा भजन नंतर भगवान बाबा संस्थानचे महंत अतुल महाराज शास्त्री यांची प्रवचन सेवा झाली ,संध्याकाळी आठ ते दहा या वेळेत स्वप्नील महाराज पवार यांनी प्रथम किर्तन पुष्प समर्पित केले ,कांतीलालजी चोरडीया यांनी अन्नदान केले. विणापुजन झालेनंतर महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री यांना सामुहिक भावपुर्ण श्रद्धांजली समर्पित करण्यात आली .यावेळी शिरूर नगरपंचायतचे प्रथम नगराध्यक्ष,गटनेते ,सभापती ,नगरसेवक यांचे सह शेकडो पंचक्रोशितील भाविक उपस्थित होते.



छत्रपती संभाजी नगर महापालिकेचे नवनिर्वाचीत नगर सेवक राजू वैद्य यांचा सत्कार त्यांचे ज्येष्ठ बंधू आणि बीड येथील ज्येष्ठ पत्रकार विनायक वैद्य यांनी केला.

CMYK